सोलापूर **तरुण भारत**

Solapur Tarun Bharat

न मे कर्मफले स्पृहा

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. २१ मार्च २०२५ | वर्ष दुसरे | अंक ३५४ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


# हर हर गंगे म्हणत, अथांग नाथसगरात लाखो भाविकांचे शाहीस्नान





तभा वृत्तसेवा

पैठण दि २० :- नाथषष्ठी यात्रेच्या पहिल्या दिवशी आमदार विलास बाप्पू भुमरे,जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते सपत्निक विधिवत नाथसमाधीचे पूजन करण्यात आले. यावेळी राज्यात सुख समृद्धी नांदू द्यावी अशी प्रार्थना नाथचरनी करण्यात आली. नाथवंशज पुष्कर महाराज गोसावी,रघुनाथ महाराज पालखीवाले, नाथसंस्थानचे कार्यकारी विश्वस्त दादा पाटील बारे यांच्याहस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी एसडीएम नीलम बाफना, तहसीलदार दत्तात्रय भारस्कार, उपविभागीय पोलीस अधिकारी सिद्धेश्वर भोरे, मुख्याधिकारी तथा प्रशासक संतोष आगळे,राज्य दूध महासंघाचे नंदलाल काळे, नामदेवराव खराद,शहादेव लोहारे,,जिप सीईओ अंकित, राजेंद्र देसले, पोलीस निरीक्षक संजय देशमुख,बीडीओ मनोरमा गायकवाड यांची उपस्थिती होती.

आज नाथषष्ठीचे औचित्य साधून पैठण येथील शांतीब्रम्ह संत एकनाथ महाराज मंदिरात समाधीचे मनोभावे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. यावेळी राज्यातील जनतेच्या सुख आणि समृद्धीसाठी प्रार्थना केली.

भक्तिरसाने ओथंबलेला जीवनप्रवास आणि समाजप्रबोधनाचा संदेश आजही प्रेरणादायी आहे. संत एकनाथ महाराजांनी सामाजिक ऐक्य, समर्पण आणि समतेचा संदेश दिला. त्यांच्या विचारांचा स्वीकार करून समाजसेवेसाठी अधिक कटिबद्ध राहण्याचा निर्धार यावेळी केला असल्याची प्रतिक्रिया यावेळी आमदार विलास बाप्पू भुमरे यांनी दिली.

दरम्यान भाविकांना गोदावरी पात्रात स्वच्छ पाण्यात स्नानासाठी नाथसागर जलाशयाच्या २ गेट मधून पाणी सोडण्यात आले. तथापी अथांग नाथसागर धरणात नाथषष्ठीच्या पहिल्या दिवशी लाखो भाविक भक्तांनी मोक्षाची बुडी घेऊन शाहीस्नान करूम प्रयगराज येथे नुकत्याच संपन्न झालेल्या महाकुंभाची आठवण करून दिली.

सकाळी नाथवंशजांच्या मनाची निर्यान दिंडीने सर्वच भाविकांचे लक्ष वेधून घेतले. गावांतील श्री संत एकनाथ महाराज यांचा राहतावाडा ते वाळवंट मार्गे कृष्णकमल तीर्थ आणि नाथ समाधी मंदिर असा दिंडीचा क्रम होता.

अन्नदानासाठी पैठणकरांचा भरभरून सहभाग पहावयास मिळत असून सकाळ पासूनच संपूर्ण पैठण शहरात नाथषष्ठी निमित्य आलेल्या भाविक भक्तांसाठी भक्तांनी पिण्याचे पाणी,अल्पोपहार, जेवण, थंड पेय,फळ वाटप आदी बाबीत हिराईने सहभाग घेतला.साधू संत येती घरा, तेची दिवाळी दसरा या म्हणीला प्रचीती देत संपूर्ण पैठणला आनंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. अगदी जागोजागी भक्तांसाठी वरील सेवा देण्यात येत असल्याने सेवाभावाच्या बाबतीत पैठणकर आदर्श निर्माण करत आहेत. उन्हाळ्यात नामशेष झालेली पाणपोई यंदा नाथषष्ठीत जागोजागी पाहायला मिळाली. एकंदरीत नाथषष्ठीत आलेल्या लाखो भक्तांसह पैठणवासियांमध्ये नवचैतन्याचे वातावरण आहे. शुक्रवारी मध्यरात्री गावांतील नाथमंदिरापासून नाथांच्या पवित्र पादुकांची छबिना निघणार आहे. शेकडो वर्षांची परंपरा असलेल्या या छबिना उत्सवाला नाथवंशजातील आपसी तणावामुळे गालबोट लागून छबिण्याची परंपरेला खंड पडला होता. हा प्रकार पुन्हा घडूनये म्हणून पोलीस निरीक्षक संजय देशमुख हे परिस्थितीवर लक्ष ठेऊन आहेत.शनिवारी सायंकाळी सुर्यास्तासमयी काला दहीहंडी फोडून नाथषष्ठी यात्रा उत्सवाची सांगता होणार आहे.

## अखिल भारतीय प्रतिनिधी सभेत बांगलादेशातील हिंदुंवरील अत्याचार आणि संघशताब्दी वाटचालीवर होणार चर्चा




बेंगळुरू, १९ मार्च : बांगलादेशातील हिंदुंवर झालेल्या अत्याचाराबाबत चर्चा आणि पुढील कार्यवाही तसेच संघशताब्दी या विषयांवर अखिल भारतीय प्रतिनिधी सभेच्या बैठकीत चर्चा होईल, अशी माहिती राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे अखिल भारतीय प्रचार प्रमुख सुनील आंबेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी व्यासपीठावर दक्षिण मध्यक्षेत्राचे (कर्नाटक, आंध्र आणि तेलंगणा) क्षेत्र कार्यवाह एन टीप्पेस्वामी, तसेच पत्रकार परिषदेला अखिल भारतीय सह प्रचार प्रमुख नरेंद्र कुमार आणि प्रदीप जोशी उपस्थित होते.

२१, २२ आणि २३ मार्चला येथील जनसेवा विद्या केंद्र परिसरात प्रतिनिधी सभा होत आहे. प्रतिनिधी सभेच्या सुरुवातीला रा. स्व. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबाळे संघाच्या कार्याच्या स्थितीचा अहवाल सादर करतील. त्यानंतर विविध प्रांतांच्या कार्यकर्त्यांकडून देशभरातील उपक्रम आणि कार्यक्रमांचे निवेदन होईल, अशी माहिती श्री. आंबेकर यांनी दिली.

पू. सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांच्या देशव्यापी प्रवासाचे नियोजनालाही या सभेत अंतिम स्वरूप दिले जाईल, असे आंबेकर यांनी सांगितले. या प्रतिनिधी सभेत ३२ संघप्रेरित संघटना आणि विविध संघटनांचे संघटन मंत्री, सहसंघटन मंत्री सहभागी होतील. त्यात भारतीय मजदूर संघाचे अध्यक्ष, राष्ट्र सेविका समिती प्रमुख संचालिका शांताक्का, भाजपचे अध्यक्ष जे.पी. नड्डा, अभाविपचे राज शरण, विहिंप अध्यक्ष आलोक कुमार, वनवासी कल्याण आश्रमाचे सत्येंद्र सिंह, विद्या भारती आणि इतर अनेक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी होतील.

श्री. आंबेकर पुढे म्हणाले, या वर्षी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्ष पूर्ण होत आहेत. प्रतिनिधी सभेत संघाच्या कार्याच्या विस्तारावर विचारविनिमय होईल. विजयादशमी २०२५ ते विजयादशमी २०२६ हे संघाचे शताब्दी वर्ष साजरे केले जाईल. पंच परिवर्तन- सामाजिक समरसता, कुटुंब प्रबोधन, पर्यावरण जागरूकता, 'स्व' चा बोध आणि नागरिकांची कर्तव्ये यावरही या बैठकीत चर्चा होणार आहे.

तीन दिवसांच्या बैठकीदरम्यान दोन प्रस्ताव मांडले जाणार आहेत. बांगलादेशातील घडामोडी, हिंदू आणि इतर अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार आणि पुढील कार्यवाही, संघाच्या शताब्दी वर्षादरम्यानचे उपक्रम आणि पुढील वाटचाल याविषयी हे दोन प्रस्ताव असतील. १५२५ मध्ये जन्मलेल्या शूर योद्धा राणी अब्बक्का यांच्या ५०० व्या जन्मवर्षानिमित्त त्यांच्या स्मरणार्थ एक विशेष निवेदन देखील प्रस्तुत करण्यात येईल, अशी माहिती त्यांनी दिली.

यावर्षी ९५ संघ शिक्षा वर्ग आयोजित केले जातील, असेही त्यांनी सांगितले.

## छत्तीसगडमध्ये चकमकीत ३० नक्षलवादी ठार




बीजापूर : छत्तीसगडमधील बीजापूर आणि कांकेर या दोन ठिकाणी झालेल्या चकमकीत ३० नक्षलवादी ठार झाले. बीजापूरमध्ये २६ आणि कांकेरमध्ये ४ नक्षलवादी ठार झाले. सुरक्षा पथकांनी गुरुवार २० मार्च २०२५ रोज सकाळी सात वाजल्यापासूनच नक्षलवाद्यांविरोधात कारवाई सुरू केली. या कारवाईद्वारे सुरक्षा पथकांनी नक्षलवाद्यांना मोठा दणका दिला.

एक चकमक बीजापूर - दंतेवाडा सीमेजवळच्या जंगलात बीजापूरमध्ये तर दुसरी चकमक कांकेरमध्ये झाली. दिवसभरात झालेल्या दोन चकमकींपैकी एका चकमकीत एक जवान हुतात्मा झाला. छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णू देव साई आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह या दोघांनी सुरक्षा पथकांचे त्यांच्या कामगिरीसाठी कौतुक केले आहे.

## ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर; मुख्यमंत्र्यांची घोषणा

### ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर



मुंबई : जगातील सर्वात उंच पुतळा असा लौकिक असणाऱ्ा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'सह शेकडो पुतळे घडवणारे आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र भूषण २०२४ (चरहरींहींीर लहींीहरप) पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत विधानसभेत घोषणा केली. राज्य सरकारकडून 'महाराष्ट्र भूषण' हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांना यंदाचा महाराष्ट्र भूषण २०२४ पुरस्कार जाहीर करण्यात येत आहे. राम सुतार यांचं वय १०० वर्ष आहे, आजही ते शिल्प तयार करतात अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी सभागृहात दिली. विशेष म्हणजे गेल्याच महिन्यात राम सुतार यांचा १०० वा वाढदिवस साजरा करण्यात आला आहे.

राम सुतार यांचा जन्म इ.स.१९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे झाला होता. राम सुतार यांनी जेजे स्कूल ऑफ ओरिएंटमधून आपले शिक्षण पूर्ण केले असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षणासोबत त्यांनी वेरूळ गुंफांमध्ये काम केले. त्यानंतर, काही वर्षांनी त्यांनी स्वतः चा शिल्पकला व्यवसाय सुरू केला. राम सुतार हे आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मुक्त शिल्पकार आहेत. देशभरात त्यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. त्यामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या देशातील सर्वात उंच शिल्प पुतळ्याचे कामही त्यांनीच केले आहे. राम सुतार हे नामवंत वास्तुविशारद असून त्यांच्या कारकिर्दीच्या गेल्या ४० वर्षात पन्नासहून अधिक भव्य शिल्पे तयार केली आहेत. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल त्यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**बॉडी बिल्डरचा पहिला पुतळा**

राम सुतार यांनी १९४७ साली बॉडी बिल्डरचा पहिला पुतळा बनवला. आपल्याच शाळेसाठी १९४८ साली महात्मा गांधीजींचा पुतळा बनवला. आणि इथूनच त्यांचा शिल्पकलेचा प्रवास सुरू झाला. १९५२ मध्ये त्यांचे प्रमिलाशी लग्न झाले आणि त्यांच्याप्रमाणेच त्यांचा एकुलता एक मुलगा अनिल सुतार (१९५७ मध्ये जन्म) देखील एक शिल्पकार आहे आणि त्याने त्यांच्या वडिलांसोबत पुतळ्याच्या डिझाइनमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. मला भारतातील रॉकेट प्रक्षेपण स्थळावर एक मूर्ती बनवायची आहे, असे त्यांनी यापूर्वी म्हटले होते. अरबी समुद्रात साकारण्यात येणाऱ्या शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे कामही त्यांच्याकडेच आहे. जोशी सरांनी त्यांना मुंबईतील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट्समध्ये शिक्षण घेण्याविषयी सुचविले, शिवाय त्यांची राहण्याची व उदरनिर्वाहाची सोयही करून दिली. त्यांनी सुवर्णपदकही मिळविले.

**१६ पुतळे**

राम सुतार यांनी चंबळच्या देवीची मूर्ती साकारली होती. ही मूर्ती पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांना इतकी आवडली की, त्यांना भाक्रा नानगल धरणावर ब्राँझचा पुतळा बनवण्यास सांगितले; मात्र काही कारणामुळे हा प्रकल्प अपूर्ण राहिला. त्यानंतर सुतार यांनी संसदेच्या आवारात बसविण्यात आलेले शिवाजी महाराज, महात्मा गांधी, नेहरू, इंदिरा गांधी, सरदार वल्लभभाई पटेल, भगतसिंग, महात्मा फुले, अशा थोर विभूतींचे जवळपास १६ पुतळे बनवले.

## दोन बाल वारकऱ्यांचा गोदावरी पात्रात बुडून मृत्यू



तभा वृत्तसेवा

पैठण दि २० :- संत एकनाथ महाराज पालखी ओटा मागील गोदावरी पात्रात बुडून १३ वर्षीय तसेच १० वर्षीय असे दोघा बाल वारकरी भक्तांचा मृत्यू झाल्याने नाथषष्ठी यात्रेत हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

नाथषष्ठी यात्रा उत्सवाच्या पहिल्या दिवशी पालखी ओटा मागील फडकरी विसावलेल्या गोदावरी वाळवंट पात्रातील पाण्यात बुडून पैठण शहरात वारकरी संप्रदायाचे शिक्षण घेण्याऱ्या दोन बाल वारकरी भक्त यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून गुरुवारी संध्याकाळी चैत्यन अंकुश बदर वय १३ वर्ष रा. वालसा खालसा तालुका भोकरदन जि. जालना याचा मृतदेह पाण्याबाहेर काढण्यात पोलिसांना यश आले आहे. तर दुसरा बालवारकरी भोलेनाथ कैलास पवळे वय १० वर्षे राहणार चितेगाव तालुका पैठण जि छत्रपती संभाजीनगर याचा शोध घेतल्या जात आहे.

गुरुवारी सकाळी गोदावरीत स्नानासाठी वरील दोघे बालवारकरी पालखी ओटा मागील गोदावरी पात्रात उतरले असता पाण्यात मोठा खड्डा असल्याने त्यांना पाण्याचा थाव लागला नाही आणि बघता बघता हे दोघे पाण्यात बुडाले.यारी मशीन ट्रॅक्टरच्या साहाय्याने परिसरात होत असलेले अवैध वाळू उत्खननामुळे पाण्यात निर्माण झालेल्या खोल खड्ड्यात बुडून या दोन्ही बालवारकरी भक्तांचा मृत्यू झाल्याचे बोलले जात आहे. शासनाच्या वतीने पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू पडलेल्या या बालवारकरी भक्तांच्या परिवाराला शासकीय मदत देण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.पोलीस निरीक्षक संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली घटनेचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक दशरथ बुरकुल हे करीत आहेत.

# तालुक्यात चार हजार वीज ग्राहकांचे कनेक्शन कायमस्वरूपी बंद

## कन्नड तालुक्यात महावितरणचे थकले नऊ कोटी रुपये

तभा वृत्तसेवा

कन्नड: दि.२० मार्च - तालुक्यात कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित केलेल्या ४६७७वीज ग्राहकांकडे महावितरणचे बिला पोटी ९ कोटी ९३ लाखरुपये थकले असून ३१ मार्च पर्यंत ते भरण्यास अभय योजने अंतर्गत मुदत वाढ देण्यात आली असली तरी मुदत संपण्याच्या अगोदरच कायमस्वरुपी वीज पुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांचे थकीत बिल,सद्यस्थितीत त्या जागेवर चालू असलेल्या दुसऱ्या ग्राहकांच्या वीज बिलात समाविष्ट होत आहे, त्यामुळे ग्राहकांनाचा याचा नहाक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

३१ मार्च २०२४ पर्यंत कायमस्वरूपी वीज पुरवठा खंडित झालेल्या थकीत ग्राहकांसाठी १ सप्टेंबर २०२४ पासून अभय योजना सुरू करण्यात आली होती सुरुवातीला ही योजना फक्त सहा महिन्यापर्यंत लागू होती मात्र योजनेच्या कालावधीत वाढ करुन ३१ मार्च २०२५ पर्यंत थकीत बिल व त्यावरील व्याज कमी करुन बिल भरण्यास मुदत देण्यात आली असली तरी तालुक्यातील अनेक वीज पुरवठा खंडित केलेल्या वीज ग्राहकांचे थकीत बिल मुदत संपण्याआधीच महावितरणने नवा फंडा आजमावत ज्या जागेवर एखाद्या भाडेकरू ने अगोदर मीटर घेतलेले होते व ते मीटर थकीत बिलामुळे कायमस्वरूपी बंद केले आहे. असे थकीत मीटरचे बिल नियमित वीज बिल भरणाऱ्या मूळ जागा मालकांच्या बिलात तसेच व्यावसायिक ग्राहकांचे वीज बिल त्यांच्या घरगुती बिल वर टाकण्यात (वळवण्यात) आल्याने याचा अनेकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**काय आहे अभय योजना**

बिलाच्या थकीत रक्कम व त्या रकमेला लावलेल्या व्याजाला सूट देण्यात येते आता या थकबाकीदार बिलांमुळे कायमचे कनेक्शन तोडलेल्या घरगुती, व्यावसायिक आणि औद्योगिक वीज ग्राहकांना कायदेशीर कारवाईच्या कटकटी पासून दिलासा देण्यासाठी महावितरणची अभय योजना आहे, या योजनेची मुदत ३१ मार्च २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे


**तालुक्यातील एकूण ४६७७ थकीत वीज बील ग्राहक ( कायमस्वरूपी वीज पुरवठा बंद असलेले) त्या वीज ग्राहकांकडे कडे महावितरणचे बिला पोटी ९ कोटी ९३ लाख रुपये थकीत१३ मार्च २०२५ अखेर ३७१ ग्राहकांनी ४९ लाख २९ हजार थकीत वीज बिल भरून अभय योजनेचा लाभ घेतला.**

### नियम काय सांगतो

**ज्या जागेवर वीज मीटर घ्यायचे आहे. त्या जागेवर अगोदरचे जर कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित करून वीज मीटर काढून नेले असेल तर त्या जागेवर नवीन कनेक्शन घेण्यासाठी थकबाकी प्रमाणपत्र (एनओसी) घेणे बंधनकारक आहे. मात्र असे असताना अनेक ठिकाणी त्याच जागेवर नवीन वीज जोडणी दिली कशी हा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो.**

**नियमित वीज भरणाऱ्या वीज ग्राहकांच्या बिलात अगोदरच्या ग्राहकाचे थकीत बिल लागून आले असेल त्यांनी महावितरण कार्यालयशी संपर्क करावा. तसेच कायमस्वरूपी वीजपुरवठा खंडित केलेल्या ग्राहकांनी थकीत बिल मुदत संपण्याच्या आत योजनेचा लाभ घ्यावा, अन्यथा ३१ मार्च नंतर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.**

**- रमेश वाकचौरे कार्यकारी अभियंता महावितरण कार्यालय कन्नड.**

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# माजी मंत्री धनंजय मुंडे यांनी अजित दादांसह राज्य शासनाचे मानले आभार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

बीड जिल्ह्यात विमानतळ उभारून जिल्ह्याच्या विकासाला गती देण्याची मागणी विविध लोकप्रतिनिधींनी केली असून याबाबतचा प्रस्ताव बीड जिल्हा प्रशासनाने संबंधित यंत्रणांना सादर केलेला आहे. बीड जिल्ह्यात सुसज्ज असे विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून, या कामाला आता गती देण्यात येणार असल्याचे राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांनी विधिमंडळात घोषित केले.

बीड जिल्हा प्रशासनाने मागील काळात याबाबतचा प्रस्ताव केंद्र व राज्य शासनास संबंधित यंत्रणांकडे सादर केलेला असून, किमान तीन किलोमीटर लांबीची धावपट्टी उभारण्याच्या दृष्टीने सुसज्ज जागा, केंद्र व राज्य सरकारच्या माध्यमातून भूसंपादन इत्यादी प्रक्रिया गतीने पूर्ण करून, विमानतळ उभारणीचे काम वेगाने केले जाईल असेही अजित दादा पवार आपल्या भाषणात पुढे बोलताना म्हणाले.

बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी या घोषणेचे स्वागत केले असून, बीड जिल्हावासियांचे रेल्वे पाठोपाठ आता सुसज्ज अशा विमानतळाचेही स्वप्न पूर्ण होणार असल्याचा आपल्याला मनापासून आनंद आहे. हा निर्णय म्हणजे केवळ बीड साठीच नव्हे तर संपूर्ण मराठवाड्यासाठी मोठी उपलब्धी असून, बीड जिल्ह्याच्या औद्योगिक, कृषी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी हा महत्त्वाचा टर्निंग पॉइंट ठरणार आहे, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

धनंजय मुंडे हे बीड जिल्ह्याचे पालकमंत्री असताना याबाबतचा मूळ प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने केंद्र व राज्य सरकारकडे पाठवला होता. बीड जिल्ह्याच्या रेल्वे पाठोपाठ आता विमानतळाचे ही स्वप्न पूर्ण होणार असून गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांनी आपल्या अर्थसंकल्पावरील भाषणात देखील विमानतळ उभारण्याची मागणी केली होती. विजयसिंह पंडित यांच्यासह ही मागणी वेळोवेळी केलेल्या सर्वच लोकप्रतिनिधींचे हे यश मानावे लागेल असेही धनंजय मुंडे यांनी म्हटले आहे.

# अनुभूती व अनुभवाशिवाय शिव महापुराण कळत नाही–प.पू.श्री हरिहरानंद स्वामीजी

**नारी सन्मान महिला मंडळाच्या शिव कथेस पहिल्याच दिवशी भरभरून प्रतिसाद**

सौ. विजेता विजयसिंह पंडित यांच्या हस्ते आरती संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**गेवराई दि.२० मार्च**

ज्यांच्या डोक्यावर शिवाचा हात आहे त्यांच्याच नशिबी शिवपुराण कथा श्रवण करण्याच भाग्य असत महिलांमध्येच माँसाहेब जिजाऊ, अहिल्यादेवी, सावित्रीबाई असे महान व्यक्तिमत्व घडून गेलेले आहेत आणि महिलांचीच संख्या जास्त शिव कथेसाठी असून याच शिव कथेमुळे अनेक व्यक्तिमत्त्व घडतील व अनुभूती आणि अनुभवाशिवाय शिवपुराण कथा कळत नाही. नारी सन्मान महिला मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शिव कथेमध्ये जे लोक आहेत त्यांना अनुभूती व अनुभव आल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन शिवपुराण कथाकार प.पु. श्री हरिहरानंद भारती स्वामीजी यांनी व्यक्त केले.

या बाबत सविस्तर वृत्त असे की, नारी सन्मान महिला मंडळ व गेवराईतील महिलांच्या वतीने सात दिवसीय भव्य शिवशक्ती संगीतमय श्री शिव महापुराण कथेचे आयोजन श्री स्वामी समर्थ मंदिराजवळ दत्तनगर येथे करण्यात आले असून त्याची सुरुवात दिनांक १७ मार्च रोजी करण्यात आली. कथेच्या पहिल्या दिवशी कथाकार प.पु. श्री. हरीहरानंद भारती स्वामीजी यांनी अनेक प्रकारचे उदाहरण देत कथेचे विवचन केले. वडील म्हणजे कुटुंबाचा महादेव असून भोळ्या महादेवा सारखं स्वतःच्या कुटुंबासाठी राबत राहतो असे उद्गार यावेळी वडिलांच्या बाबतीत उपस्थित भाविक भक्तांनसमोर काढले.

# के.एस.के. महाविद्यालयात निसर्ग उपचार पध्दती आणि घरगुती उपचार पध्दती या विषयावर व्याख्यान संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

येथील नवगण शिक्षण संस्थेचे सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात कर्मचारी कल्याण समिती, हेल्थ केअर समिती आणि नेचर केअर सेंटर,सांगली यांच्या संयुक्त विद्यमाने निसर्ग उपचार पध्दती आणि घरगुती उपचार पध्दती या विषयावर डॉ.रविंद्र वाकळे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर होते. डॉ.रविंद्र वाकळे यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात मधुमेह,अपचन,केसगळती,केसपांढरे होणे,कॅन्सर,किडणी स्टोन ,मुळव्याध,वजन कमी करणे व वाढविणे,स्पाइन, मणक्याचे आजार,डोळ्याचे आजार तसेच सकाळी उठल्यावर एक कप तांब्याच्या भांडयातून पाणी पिण्याचे फायदे, तसेच उंची व वजनानुसार किमान २० किलो वजनामागे १ लिटर पाणी पिणे आवश्यक आहे. तसेच इतर आजारावर आजारी होण्याचे कारणे व त्यावर उपचार याचे सखोल असे सविस्तर मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.संध्या जोगदंड, सूत्रसंचलन डॉ. मंजू जाधाव तर आभार डॉ.नागेश शेटे यांनी मानले.

या कार्यक्रमास महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर, संस्थेचे प्रशासकिय अधिकारी डॉ.सुधाकर गुट्टे, डॉ.विश्वांभर देशमाने, उपप्राचार्य डॉ.संजय पाटील देवळाणकर,पदव्युत्तर विभाग प्रमुख डॉ.खान ए.एस., उपप्राचार्य डॉ.नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# पीएम इंटर्नशिप योजनाच्या रोजगाराची संधी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

केंद्र शासनामार्फत देशात व राज्यात जास्तीत जास्त तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील या करिता भारत सरकारच्या कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (MCA) पीएम इंटर्नशिप योजना अंतर्गत १,००,००० पेक्षा अधिक पदाकरिता संधी भारतात वेगवेगळ्या नामांकित कंपन्यांमध्ये आपणास देण्यात येत आहे.

भारतातील सर्वोच्च कंपन्यांमध्ये सशुल्क इंटर्नशिपची संधी, तसेच शासनाचा मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करण्यावर भर देण्यात आला आहे. भारतातील केंद्र शासनाच्या करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांपैकी एक असलेल्या पीएम इंटर्नशिप योजना रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी राबविण्यात येत आहे.पीएम इंटर्नशिप योजनासाठी नोंदणी सुरू झाली आहे.

या योजनेचा लाभ व अर्जाची माहिती खालीलप्रमाणे.

पात्रता- वय २१-२४ वर्षे, पूर्णवेळ शिक्षण आणि नोकरीत नाही. प्राधान्य पात्रता- इयत्ता १०, इयत्ता १२, ITI डिप्लोमा, पदवीधर

पात्रता नसणारे- उच्चशिक्षण संस्थांमधून पदवी प्राप्त केलेले (IT, IIM², NLU, IISER, NID, IIIT), C-, CM-, CS, MBBS, BDS, MB-, किंवा कोणतीही पदव्युत्तर/उच्च पदवी यांसारखी पात्रता, NAPS किंवा NATS अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले, आधीच सरकारी कौशल्य, प्रशिक्षणार्थी, इंटर्नशिप किंवा प्रशिक्षण कार्यक्रमात, कुटुंबातील कोणताही सदस्य रू. ८ लाख (आर्थिक वर्ष २०२३-२४) पेक्षा जास्त कमावतो, कुटुंबातील कोणताही सदस्य हा कायम/नियमित सरकारी कर्मचारी असतो (कुटुंबात स्वतःचा, जोडीदाराचा आणि पालकांचा समावेश होतो)

पुढील सेक्टर्स मध्ये रोजगाराची संधी

इंधन , वायू आणि ऊर्जा, दूरसंचार, (ऋचउऋ) फास्ट-मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स, बँका आणि वित्तीय सेवा, उत्पादन आणि औद्योगिक, सिमेंट आणि बांधकाम साहित्य, प्रवास आणि आदरातिथ्य, धातू आणि खाणकाम, किरकोळ आणि ग्राहक टिकाऊ वस्तू, रासायनिक उद्योग, फार्मास्युटिकल, पायाभूत सुविधा आणि बांधकाम, कृषी आणि संलग्न क्रियाकलाप, पुरवठा साखळी व्यवस्थापन, विमान वाहतूक आणि संरक्षण, आयटी आणि सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट, ऑटोमोटिव्ह, आरोग्यसेवा, टेक्सटाईल उत्पादन आदी.

रोजगाराची भूमिका खालील प्रमाणे

विक्री आणि विपणन, मानव संसाधन, ऑपरेशन्स व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, व्यवसाय विकास, वित्त आणि लेखा, गुणवत्ता नियंत्रण आणि हमी, संशोधन आणि विकास/डिझाइन/उत्पादन विकास तसेच भरतीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.https://pminternship.mca.gov.in/login/या संकेत स्थळावर नोंदणी करावी. तसेच सदर लिंक वर जाऊन नोंदणी करण्यासाठी व वारंवार अद्ययावत होणाऱ्या माहितीकरीता Beed Skill या https://www.facebook.com/beedskill/ या फेसबुक पेजला लाईक करावे व अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२४४२-२९९११६ या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता यांनी केले आहे.

# दोन वर्षांपासून सुरु असलेल्या ठेवीदारांच्या आंदोलनाला यश

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

जिल्ह्यातील दिवाळखोरीत निघालेल्या मल्टिस्टेट पैकी सर्वाधिक ठेवी असलेल्या ज्ञानराधा मल्टिस्टेटवर अखेर एमपीआयडी मंजूर केल्याची घोषणा मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात केली. दरम्यान केवळ ठेवीदारांच्या रेट्याने शासनाला एमपीआयडीचा प्रस्ताव मंजूर करावा लागला असून ठेवीदारांच्या मागण्यांसाठी दोन वर्षांपासुन सुरु असलेल्या आंदोलनाला यश आले आल्याचे ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांनी म्हटले आहे. व जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टीस्टेट, साईराम मल्टीस्टेट,राजस्थानी मल्टीस्टेट (पतसंस्था), जिजाऊ मल्टीस्टेट, शुभ कल्याण मल्टीस्टेट, मातोश्री अर्बन, लक्ष्मीमाता अर्बन, मराठवाडा अर्बन (माजलगाव)आर्थिक दिवाळखोरीत निघालेल्या आहेत. यामध्ये मराठवाड्यातील लाखों ठेवीदारांच्या ठेवी अडकल्या आहेत. ज्ञानराधा मध्ये राज्यभरातील सर्वाधिक ठेवीदारांच्या ठेवी आहेत. ठेवीदारांच्या ठेवी परत मिळाव्या यासाठी ठेवीदार कृती समितीचे राज्य समन्वयक तथा स्वाभिमानी संघटनेचे जिल्हाध्यक्ष प्रा. सचिन उबाळे यांच्या नेतृत्वाखाली रंवार उपोषण, आंदोलने केल्याने बीड पोलिसांनी सुरेश कुटे यांच्यासह जवळपास सर्वच मल्टिस्टेटमधील आरोपींना अटक केली. सर्व आरोपींना अटक करणे हे आंदोलनाचे पहिले यश आहे. ज्ञानराधावर एमपीआयडी दाखल करावा, अर्चना कुटे यांना अटक करावी अशी मागणी सुरुवातीपासून प्रा.उबाळे यांनी लावून धरली होती. यामुळे एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. मात्र काही त्रुटी निघाल्याने तो पुन्हा बीड पोलिसांकडे परत आला. या संदर्भात प्रा.उबाळे यांनी पोलिस अधीक्षकांची भेट घेऊन त्रुटींची पूर्तता करुन आठ दिवसांत एमपीआयडीचा प्रस्ताव शासनाकडे पुन्हा पाठवावा अशी मागणी केली होती. दरम्यान बीड पोलिसांनी पाठिवलेल्या ज्ञानराधावरील एमपीआयडीच्या प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली असून या संदर्भात मुख्यमंत्र्यांनी अधिवेशनात घोषण केली आहे. ठेवीदारांच्या रेट्यामुळे शासनाने एमपीआयडी मंजूर केला असून ठेवीदारांच्या आंदोलनाचे हे दुसरे यश असल्याचे प्रा.उबाळे यांनी म्हटले आहे.

राणे, धस, सोळंके यांचे मानले आभार


दरम्यान ज्ञानराधा व इतर मल्टिस्टेट संदर्भात आवाज उठविल्याबद्दल ना नितेशजी राणे, आ सुरेश अण्णा धस, आ प्रकाश दादा सोळंके,आ नारायण कुचे, आ बबनरावजी लोणीकर, आ.मेघना बोर्डीकर यांचे प्रा.सचिन उबाळे यांनी आभार मानले आहे.

# महावितरणने चालवलेला विजेचा लपंडाव केव्हा थांबणार?

## सामाजिक कार्यकर्ते अँड.मनोज संकाये यांचा सवाल

**तभा वृत्तसेवा**





**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० मार्च**

परळी शहरात गेल्या महिन्याभरापासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असून, यामुळे नागरिक व व्यावसायिक हैराण झाले आहेत. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना वीजपुरवठ्यातील अनियमिततेमुळे उकाड्याने त्रस्त झालेल्या नागरिकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. मात्र, याकडे महावितरण दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते अँड. मनोज संकाये यांनी केला आहे.

परळी शहरातील नागरिक व व्यावसायिकांना नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, वीज गेल्यानंतर दोन-दोन तास परत येत नाही. आली तरी किती वेळ टिकेल, याचा काहीही भरवसा नाही. या अनियमित वीजपुरवठ्यामुळे व्यावसायिकांचे मोठे नुकसान होत आहे. विशेषतः आईस्क्रीम, हॉटेल व इतर विजेवर अवलंबून असलेले व्यवसाय ठप्प होण्याच्या मार्गावर आहेत.

तसेच, नागरिकांकडून भरमसाठ वीजबिले आकारली जात असताना, त्यांना २४ तास वीजपुरवठा मिळत नाही, ही गंभीर बाब असल्याचे त्यांनी नमूद केले. महावितरणचे वीज वितरण वेळापत्रक संपूर्ण कोलमडले असून, वीज केव्हा जाईल आणि केव्हा येईल, याचा काहीही ठावठिकाणा नाही.

महावितरणने त्वरित हा विजेचा लपंडाव थांबवावा, अन्यथा मित्र मंडळाच्या वतीने महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही अँड. मनोज संकाये यांनी दिला आहे.

नागरिकांची मागणी – वीजपुरवठा सुरळीत करावा

परळीतील नागरिकांनी महावितरणच्या या अनागोंदी कारभाराचा निषेध नोंदवत, विजेचे वेळापत्रक निश्चित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा, आगामी काळात याविरोधात मोठे आंदोलन छेडले जाईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# अग्नीवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन नोंदणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

अग्निवीर योजने अंतर्गत वर्ष २०२५-२६ साठी होणाऱ्या अग्नीवीर भर्तीसाठी अविबाहित पुरुष आणि अविवाहित महिला उमेदवारांसाठी ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्यासाठीची अधिसूचना www.joinindianarmy.nic.in या वेबसाईट वर प्रसिद्ध करण्यात आली आहे. ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची तारीख १२ मार्च ते १० एप्रिल राहील. सामान्य प्रवेश परीक्षा संभवता जून महिन्यात प्रसिद्ध करण्यात येईल. हे भर्ती अर्ज अहिल्यानगर, बीड, लातूर, धाराशिव, पुणे आणि सोलापूर जिल्ह्यातील उमेदवार १२ मार्च ते १० एप्रिल पर्यंत भरू शकतात. तरी बीड जिल्ह्यातील जास्तीत जास्त पात्र उमेदवारांनी या संधीचा फायदा घेऊन दि. १० एप्रिल पूर्वी नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल शरद पांढरे (नि.) यांनी केले आहे.

# गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष रतन गुजर यांचा शिवसेनेच्या वतीने सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**

गुजर समाजाचे जिल्हाध्यक्ष झाल्या मुळे शिवसेनेच्या व सर्व समाज बांधवांच्या वतीने रतन गुजर यांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सामाजिक कार्यात अग्रेसर राहिलेले रतन गुजर यांची नुकतीच अखिल भारतीय गुर्जर देवसेना संघटनेकडून बीड जिल्हाध्यक्षपदी निवड झाली आहे त्याबद्दल त्यांचा शिवसेनेचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सत्कार करुन म्हटले की, मी शिवसेनेचा जिल्हाप्रमुख आहे आणि तुम्ही गुजर समाजाचे जिल्हाप्रमुख आहात आपले दोघांचे काम आहे समाजकारण या कार्यामध्ये आपल्याला कोठेही अडचण आल्यास शिवसेना एक परिवार म्हणून तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा राहील व तुमच्या समाजाच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी शिवसेना तुमच्या बरोबर आहे तसेच याप्रसंगी गुजर समाजाचे पहिले जिल्हाध्यक्ष हनुमान बहिरवाळ यांनीही आम्ही आता मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावू तुम्ही काम करत राहा तुमच्या पाठीशी सर्व समाज उभा राहील असे आश्वासन दिले यावेळी तरी या कार्यक्रमाला विनायक गुजर, सुनील गुजर, हनुमान बजरंग गुजर, लक्ष्मण बहिरवाळ व सर्व समाज बांधव उपस्थित होते

# लिंबागणेश ग्रामपंचायत कार्यालयात आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांप्रती सहवेदना व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस-डॉ.गणेश ढवळे

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० मार्च**



शेतकऱ्यांच्या आत्महत्या हि राष्ट्रीय आपत्ती असुन आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी सिलिंग, आवश्यक वस्तु, जमीन अधिग्रहण कायदे रद्द करण्यात यावेत या प्रमुख मागणीसह यवतमाळ जिल्ह्यातील चिलगव्हाण येथील साहेबराव करपे,मालतीताई करपे यांनी १९ मार्च १९८६ रोजी आर्थिक विवंचनेतुन आपल्या ४ लहान मुलांसह सामुहिक आत्महत्या केली होती.या सामुहिक आत्महत्येची शासन दरबारी पहिली शेतकरी आत्महत्या म्हणून नोंद झाली.या घटनेला यावर्षी ३९ वर्षे पूर्ण झाली आहेत. नॅशनल क्राईम रेकॉर्ड पोलिसांच्या माहितीनुसार देशभरात दररोज सुमारे ४५ शेतकरी आत्महत्या करतात. तर महाराष्ट्रात दररोज सुमारे १५ शेतकरी आत्महत्या करून मृत्युला कवटाळतात. बीड जिल्ह्यात २०१४ ते २०२४ या १० वर्षाच्या कालावधीत २४३२ शेतकऱ्यांनी आत्महत्या करून जीवन संपवले आहे.

८ वर्षांपासून १९ मार्च २०१९ पासुन किसानपुत्र आंदोलनाचे प्रणेते अमर हबीब आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी राज्यातील आणि देशातील आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी दरवर्षी १९ मार्च रोजी अन्नदात्यासाठी एक दिवस उपवास करून शासनाच्या शेतकरी विरोधी धोरणाविरोधात प्रभावी संदेश देण्यासाठी शेतकरी आत्महत्या रोखण्याचा कायमस्वरूपी उपाय म्हणून शेतकरी विरोधी कायदे रद्द रद्द करण्यात यावेत.प्रशासनाच्या निष्क्रियतेला जाब विचारण्यासाठी, शेतकऱ्यांचे हक्क व अस्तित्व वाचवण्यासाठी एल्गार करण्याच्या उद्देशाने संवेदनशील नागरीकांनी एक दिवसाचा कडकडीत उपवास करत आपल्या सहवेदनेचा, पाठिंब्याचा आणि आंदोलनाच्या जाज्वल्य हेतुचा जागर करण्यासाठी अमर हबीब यांच्या मार्गदर्शनाखाली वैयक्तिक उपवास, सामुहिक उपोषण, श्रद्धांजली सभा आदिंचे आयोजन करण्यात यावे असे आवाहन करण्यात आले असुन या आवाहनाला प्रतिसाद देत किसानपुत्र आंदोलक डॉ.गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली आज दि.१९ बुधवार रोजी सकाळी १० ते ४ वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात सामुहिकरीत्या एक दिवस अन्नत्याग आंदोलन करत आत्महत्या केलेल्या तमाम शेतकऱ्यांप्रती आदरभाव व्यक्त करण्यासाठी शेतकरी सहवेदना दिवस पाळण्यात आला. यावेळी आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, माजी पंचायत समिती सदस्य राजेभाऊ गिरे, ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, महादेव कुदळे, अँड.गणेश वाणी, भगवान मोरे, रामकिसन गिरे, पांडुरंग वाणी, रामचंद्र मुळे,आश्रुबा गिरे, राजेंद्र वायभट, साहेबराव निर्मळ , महादेव ढास, संतोष भोसले, संजय सुकाळे , पत्रकार हरीओम क्षीरसागर आदी सहभागी झाले होते.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सिल्लोडमध्य शासकीय कार्यालयांमध्ये सर्वसामान्यांकडून सर्रास टोल वसुली

## टोल वसुलीत रजिस्टर कार्यालय सर्वात अग्रेसरए

गजानन मरकड

सिल्लोड - हे मंगळवारी (दि. १८) पंचायत समितीच्या रोजगार हमी योजनेतील कंत्राटी तांत्रिक अभियंताला एसीबीने लाच घेताना पकडल्याने अधोरेखित झाले आहे. यात महसूल, कृषी व पंचायत समितीचे कर्मचारी व रजिस्ट्री कार्यालयअग्रेसर असल्याची बाब आतापर्यंतच्या एसीबीने केलेल्या कारवायांमधून समोर आली आहे.

तालुक्यात काही शासकीय कार्यालयांना लाचखोरीचे ग्रहण लागले असून एसीबीच्या वाढत्या कारवायांमुळे महसूल, कृषी, राजिष्ट्री, पंचायत समिती कार्यालयांवर टोल वसुलीचा दाग लागला आहे. दीड-दोन वर्षात महसूल विभागातील तलाठी, कोतवाल व दोन कर्मचारी असे चार कर्मचारी वाळू प्रकरणाच्या लाचखोरीत अडकले. तर कृषी विभागाचे कृषी सहायक, लिपिक यांनाही टोल वसुलीचा मोह नडला व एसीबीच्या जाळ्यात अडकले. कृषीचे अधिकारी, मंडळ अधिकारी, कृषी सहायक यांनी तर पोखरा योजनेत चांगलेच हाथ घुवून घेतले. एवढेच नाही तर काही मंडळ अधिकारी, कृषी सहायक चक्क कृषी साहित्य दुकानदारांचे भांडवलदार (पार्टनर) असल्याचे बोलले जात आहे. यातून काही कर्मचारी मालामालही झाले आहे. पंचायत समितीतील कंत्राटी तांत्रिक अभियंता लाच घेताना पकडण्याची मंगळवारी दुसरी घटना घडली व पुन्हा एकदा लाचखोरीचा मुद्दा चर्चेत आला. तशी पंचायत समितीत ही पहिली कारवाई नाही. यापूर्वीही एका कंत्राटी तांत्रिक अभियंता लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. गेल्या वर्षी तर राजिष्ट्री कार्यालयात पकडलेल्या सहायक निंबधकाच्या घरात मोठे घबाड सापडले होते.

या कारवाईची चर्चा जिल्ह्यात झाली होती. रोजगार हमी अर्ध्यात तुम्ही अर्ध्यात आम्ही अशी म्हण रोजगार हमी योजने कामांसाठी सर्वसामान्यांमध्ये प्रचलित आहे. तसाच काहीसा प्रकार पंचायत समितीच्या रोजगार हमी विभागात सध्या सुरु असल्याची चर्चा आहे. गेल्या वर्षी निवडणुकीच्या आधी मागेल त्याला विहीर योजने अंतर्गत तालुक्यात जवळपास ५ हजारांपेक्षा अधिक वयक्तिक लाभांच्या विहिरींना मंजुरी देण्यात आली. यात गावापासून ते पंचायत समितीपर्यंतच्या एजंटांनी लाभार्थी शेतकऱ्यांना लुबाडले. हा मुद्दा तसा तालुक्यात बराच गाजला. आता पुन्हा विहिरींचे देयके (बिल) मंजूर करण्यासाठी सर्रास पैशांची मागणी केली जात असल्याचे एसीबीच्या कारवाईमुळे समोर आले आहे. एकंदरीत आंधळ दळतंय अन कुत्र पिठ खातंय अशी गत काही महत्वाच्या शासकीय कार्यालयांची झाली आहे.

टोल वसुली मागचा बोका कोण?

काही शासकीय कर्मचारी बिनधास्त सर्वसामान्यांकडे पैशांची मागणी करतात. तसा टोल वसुलीचा मुद्दा यापूर्वी आमसभांमध्ये चांगलाच गाजलेला आहे. तरी देखील खुलेआम पैशांची मागणी करण्याचे बळ या कर्मचाऱ्यांमध्ये कोठून येते ?, कर्मचाऱ्यांच्या खांद्यावर बंदूक ठेवून निशाणा साधला जातो का ? असे प्रश्न या निमित्ताने निर्माण होत असून टोल वसुली मागचा बोका कोण ? हे शोधणे गरजेचे आहे.

## एच अँड एम एस/एस २०२५ च्या फेस्टिव्हल-रेडी कलेक्शन

पुणे - एच अँड एम एस/एस २०२५ कलेक्शन हे स्त्रीत्वाला समर्पित आहे. हे भावना, संवेदना आणि ओळखींचा एक रोमांचक शोध आहे. या नव्या कॅम्पेनमध्ये प्रेरणादायी महिला आयकॉन समाविष्ट आहेत, ज्यामध्ये प्रसिद्ध संगीतकार टायला, एफकेए ट्विग्स आणि कॅरोलिन पोलाचेक ( यांचा समावेश आहे. हे कलेक्शन आणि कॅम्पेन दोन्ही क्वच्या भक्कम फॅशन व्हिजनचे प्रतीक आहे आणि संगीत व फॅशन क्षेत्रातील उत्कृष्ट डिझाइन व सहकार्याला प्रोत्साहन देते.

## यूजेनिक्स हेयर साइंसेज: केस प्रत्यारोपण क्षेत्रातील आघाडीचे नाव

मुंबई : जागतिक स्तरावर केस प्रत्यारोपण उद्योग झपाट्याने वाढत आहे. २०३२ पर्यंत अमेरिकन डॉलर्स १४१.८८ अब्ज इतका बाजारपेठेचा अंदाज वर्तविण्यात आला आहे, २०१८ ते २०३२ दरम्यान २५.२टक्के वार्षिक वाढ अपेक्षित आहे. तंत्रज्ञानातील प्रगती, वाढती जागरूकता आणि सेलिब्रिटी तसेच खेळाडूंच्या वाढत्या मागणीमुळे या उद्योगात मोठी वाढ होत आहे .

## आयडीएफसी फर्स्ट बँकेने मोबाईल बँकिंग ॲपवर एसीई फीचर लाँच

मुंबई : आयडीएफसी फर्स्ट बँकेने त्यांच्या प्रीमियम मोबाइल बँकिंग ॲपवर एस फीचर लाँच केले आहे, जे गुंतवणूकदारांना माहितीपूर्ण म्युच्युअल फंड गुंतवणूक निर्णय घेण्यास अनुमती देण्यासाठी संबंधित अंतर्दृष्टी आणि साधने प्रदान करते. या वैशिष्ट्याचा उद्देश एखाद्या व्यक्तीला 'स्वतः करा' डिजिटल पद्धतीने गुंतवणूक करण्यास सक्षम करणे आहे. आयडीएफसी फर्स्ट बँक ॲपवरील एसीई फीचर भारतातील २५०० हून अधिक म्युच्युअल फंडांची समृद्ध आणि उपयुक्त माहिती प्रदान करते. गुंतवणूकदार विविध फंड श्रेणींमध्ये (जसे की इक्विटी, डेट, कर-बचत, हायब्रिड आणि इंडेक्स फंड) ब्राउझ करू शकतात आणि वैविध्यपूर्ण पोर्टफोलिओ तयार करण्यासाठी योग्य गरज-आधारित फंड निवडू शकतात.

## कॅनन इंडियाने सतत ९ वर्षे बाजारातील हिस्स्यात आपले अव्वल स्थान कायम राखले

छत्रपती संभाजीनगर : इंटरनॅशनल डेटा कॉर्पोरेशनवर्ल्डवाइड क्वार्टरली हार्डकॉपी पेरीफरल्स ट्रॅकर, २०२४ क्यू४ द्वारा अलीकडेच प्रसिद्ध झालेल्या एका अहवालात कॅनन इंडियाला कलर, मोनो आणि ओव्हरऑल लेसर कॉपीयर मल्टीफंक्शन डिव्हाईस श्रेणींमध्ये प्रथम स्थान दिले आहे. ही मान्यता मिळाल्यामुळे इनोव्हेशन, तांत्रिक उत्कृष्टता आणि ग्राहक अनुभव वाढवण्याचा ध्यास याबाबतची कॅननची वचनबद्धता पुन्हा एकदा स्पष्ट झाली आहे. आयडीसी अहवालानुसार, २०२४ या वर्षात कॅनन इंडियाने सर्व नमूद केलेल्या सेगमेन्ट्समध्ये बाजारात वर्चस्व गाजवले आहे आणि एकंदर लेसर मल्टीफंक्शनल डिव्हाईस सेगमेन्टमध्ये त्यांचा बाजार हिस्सा २८.४% आहे.

## उद्योग-प्रथम कौशल्य प्रशिक्षण केंद्राचे उद्घाटन

छत्रपती संभाजीनगर - सेंट-गोबेन जिप्रोक इंडियाला आयटीआय वाडा कौशल्य प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनाची घोषणा करताना अभिमान वाटतो. उद्घाटन सोहळ्याला पालघर जिल्हा व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी महेश सेदाम आणि जिप्रोक इंडियाचे प्रमुख प्रतिनिधी उपस्थित होते.

## द बेअर हाऊससोबत कपड्यांमध्ये क्रांती घडवली

पुणे - १३ मार्च रोजी सोनी लिव वर प्रसारित झालेल्या बिझनेस रिॲलिटी टीव्ही मालिकेतील शार्क टँक इंडियाच्या नवीनतम भागात, स्मार्ट कॅज्युअलमध्ये विशेषज्ञता असलेल्या समकालीन पुरुषांच्या पोशाख आणि ॲक्सेसरीज ब्रँड द बेअर हाऊसच्या सह-संस्थापकांनी - तन्वी आणि हर्ष सोमय्या - यांनी शार्क नमिता थापरकडून ३ कोटींची गुंतवणूक मिळवली आहे.

## परमिट रूम व्यवसाय बंद करून केला शासनाचा निषेध

तभा वृत्तसेवा

कन्नड : महाराष्ट्र शासनाने व्हॅटच्या नावाखाली लावलेला १० टक्के कर विक्रीवर न लावता तो मद्य निर्मितीवर (First Point) वर लावण्यात यावा

अशी मागणी करत कन्नड तालुक्यातील सर्व परवाना धारकांनी मद्य विक्रेत्यांनी दि. २० मार्च रोजी दिवसभर व्यवसाय बंद ठेऊन शासनाचा केला निषेध.

अशा मागणीचे निवेदन त्यांनी नायब तहसीलदार (निवडणूक ) श्रावण उगले यांना दिले त्या पुढे असे म्हणले आहे की परमिट रुम (ऋङ३) मधील मद्य विक्रीवर महाराष्ट्र शासनाने व्हॅटच्या नावाखाली लावलेला १० टक्के कर मद्य निर्मितीवर (First Point) वर लावण्यात यावा, जेणेकरून व्यवसाय करणे सुलभ होईल.तसेच First Point वर सदरील व्हॅट कर लावल्यामुळे शासनाच्या उत्पन्नात सद्यास्थितीपेक्षा पाच पटीने वाढ होऊ शकते.या निवेदनावर असोसिएशनचे अध्यक्ष योगेश कोल्हे , राम वाघूळे , अनिल वाघ , भारत मिसाळ , चांगु शिंदे , भारत निकम , अनिकेत जैस्वाल , योगेश शिंदे , राजू काळे , बापू देशमुख , दीपक ताठे , कार्तिक पवार , राजेंद्र कलवाणी , सिध्दार्थ निकाळजे , रमेश नागरे , नंदू गायकवाड आदींची उपस्थिती होती .

## गोदावरी पात्रात ड्रोन द्वारे पुष्पवृष्टी करत संत गोदड महाराज दिंडी दक्षिणकाशीत दाखल




तभा वृत्तसेवा

पैठण दिनांक २० :- गंगा गोदावरी नदीवर पुष्पवृष्टी व पूजन करून टाळमृंदगाच्या गजरात मोठ्या भक्तीभावाने संत गोदड महाराज जन्मस्थळ कर्जत येथील दिंडी श्रीक्षेत्र पैठणनगरीत दाखल झाली आहे.

संत एकनाथ महाराज यांचा ४२६ वा नाथ षष्ठी यात्रा उत्सवात सहभागी होण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून तसेच कर्नाटक मधील अनेक संत मंहतासह शेकडो दिंड्या पैठणनगरीत दाखल झाल्या आहे. यामध्ये सर्वांचे आकर्षण असलेली संत गोदड महाराज यांच्या जन्मस्थळ कर्जत येथील य दिंडीचे मोठ्या दिमाखदार आणि मोठ्या उत्साहात आगमन पैठण शहरात झाले. या दिंडीचे प्रमुख प्रवीणदादा घुले यांनी गोदावरी गंगापूजन करून ड्रोनद्वारे पुष्पवृष्टी आणि गुलाब जल चे स्प्रे करून गंगा गोदावरीची साडी ने ओटी भरून मोठ्या भक्तीभावाने पैठण शहरात प्रवेश केला. हा सोहळा बघण्यासाठी वारकरी व पैठण नगरी मधील भावीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी सर्व दिंडीतील वारकऱ्यांनी गंगापूजन करून पैठण नगरीत तीन दिवसीय यात्रेत सहभागी होण्यासाठी हरिनामाचा नामस्मरण सुरू केले आहे. यावेळी दिंडी प्रमुख प्रवीण दादा घुले यांनी गंगा पूजन दरम्यान गंगा गोदावरी नदी पात्रात शहराचे मलमूत्र दाखल होत असल्याने असून याच प्रदुषित गोदावरी पात्रात भाविकांना स्नान करावे लागते. याबद्दल नाराजी व्यक्त केली.कावसणकर स्टेडियम समोर दवाखान्याच्या शेजारी या दिंडीचे स्थान आहे.

## संघ हीच जीवनगाथा



अलकः- (७१) आराधन

हे रा. स्व. संघाचे गीत आहे हे गीत सुप्रसिद्ध शाहीर योगेश यांनी लिहिले आहे.

हम करे राष्ट्र आराधन  
तनसे, मनसे, धनसे,  
तन-मन-धन- जीवन से  
हम करे राष्ट्र आराधन ।।धृ।।  
अंतर से, मुख से, कृती से,।  
निश्चल हो निर्मल मतिसे ।।  
श्रद्धा से, मस्तक नत से।  
हम करे राष्ट्र अभिवादन ।।१।।  
अपने हसते शैशवसे।  
अपने खिलते यौवनसे ।।  
प्रौढता पूर्ण जीवन से।  
हम करे राष्ट्र का अर्चन ।।२।।  
अपने अतीत को पढकर।  
अपना इतिहास उलटकर ।।  
अपना भवितव्य समझकर ।  
हम करे राष्ट्र का चिंतन ।।३।।  
है याद हमे युगयुग की।  
जलती अनेक घटनाये।।  
जो माँ की सेवा पथ पर।  
आई बनकर विपदाएं।  
हमने अभिषेक किया था।  
जननी का अरि-शोणितसे।  
हमने श्रृंगार किया था।  
माता का अरि- मुंडो से।  
हमने ही उसे दिया था।  
सांस्कृतिक उच्च सिंहासन।  
माँ जिसपर बैठी सुख से।  
करती थी जग का शासन।  
अब कालचक्र की गतिसे।  
वह टूट गया सिंहासन ।  
आपना तन-मन-धन देकर।  
हम करे राष्ट्र आराधन ।।४।।  
।। भारत माता की जय ।।

क्रमशः

लेखन : सौ. सुरेखा विजय काणे,  
छत्रपती संभाजीनगर. मो. ९९६००५३५२१,  
माजी जिल्हा बौद्धिक प्रमुख राष्ट्र सेविका समिती

## बुलढाणा अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.बुलढाणा संस्थेचे अध्यक्षपदी डॉ.सुकेशजी झंवर यांची निवड



सोयगाव,दि.२० मार्च : बुलढाणा अर्बन को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.संस्थेच्या जळगाव खान्देश मालकीच्या कोल्ड स्टोरेजच्या(शीतगृह )मालकीच्या कोल्ड स्टोरेजच्या शुभारंभ सोहळा व ग्राहक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. त्यानिमित्ताने बुलढाणा अर्बन को. ऑप.क्रेडिट सोसायटी लि.बुलढाणा संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष पदी डॉ.सुकेशजी झंवर यांची निवड झाल्याबद्दल सोयगाव शहरातील कै.बाबुरावजी काळे ग्रामीण बिगर शेती सहकारी पंतसंस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला आहे. यावेळी कै.बाबुरावजी काळे पंतसंस्थेचे व्हा.चेअरमन योगेश बोखारे,फर्दापूर केंद्राचे केंद्र प्रमुख मोतीराम जोहरे मुख्याध्यापक किरण पाटील,संजय दळवी विभागीय व्यवस्थापक विभाग सिल्लोड,अमोल जाधव,कृष्णा शेवाळकर,विशाल घन,नितीन जगताप,बुलढाणा अर्बन बँक सोयगाव शाखेचे मॅनेजर गजानन सोनवणे,संजय गायकवाड,दिनेश पाटील,आदींसह उपस्थित होते.

## राजेंद्रसिंग परिहार यांचे निधन.



गंगापूर दि.१७: येथील राजेंद्रसिंग मोहनसिंग परिहार यांचे अल्पशा आजाराने दिनांक( १७) सोमवारी निधन झाले, त्यांच्यावर सायंकाळी गंगापूर येथील अमरधाम येथेअंत्यसंस्कार करण्यात आले ते जगतसिंग मोहनसिंग परिहार व प्रतापसिंग मोहनसिंग परिहार यांचे मोठे बंधू होत.

यूनियन बैंक ऑफ इंडिया Union Bank of India

क्षेत्रीय कार्यालय - अहमदनगर  
प्लॉट नं. ३, ४, ८ व ९, बोल्हेगाव पुलाजवळ, नगर मनमाड रोड, नागापूर, अहमदनगर - ४१४१११

**भाडेतत्वावर जागा पाहीजे**

युनियन बँक ऑफ इंडियाला जालना मुख्य शाखेकरिता प्रामुख्याने तळमजल्यावर जालना शहरात सराफ बाजार परिसरात सर्व सुविधा असलेली १७०० (+ - १०%) कमर्शिअल जागा भाडेतत्वावर हवी आहे. याबाबतची अधिक माहिती बँकेचे ई प्रोक्युअरमेंट पोर्टल www.eprocure.gov.in / www.unionbankofindia.co.in वर उपलब्ध आहे.

इच्छुकांनी विहीत नमुन्यातील निवीदा या दि. ११/०४/२०२५ दुपारी ४.00 वाजेपर्यंत वरील पत्त्यावर सादर कराव्यात. या प्रकल्पाबाबत काही सुधारणा / बदल असल्यास ते बँकेच्या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्यात येतील. त्याबाबत वर्तमानपत्रांतुन जाहिरात प्रसिद्ध केली जाणार नाही. प्राप्त निवीदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार बँकेने राखुन ठेवला आहे.

दि. २०/०३/२०२५  
अहमदनगर

क्षेत्रीय प्रमुख  
क्षेत्रीय कार्यालय, अहमदनगर

ARL

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,  
E-mail:-mchhingoli@gmail.com  
विभागः- पापु/स्वच्छता जा.क्र ४६०/२०२४-२५ दिनांक / /२०२५

**हिंगोली नगर परिषद, हिंगोली**  
**ई-निविदा २०२४-२५**

जा.क्र. पाणी/स्वच्छता/४६०/२०२४-२५  
दिनांक : २०/३/२०२५

ई-निविदा सुचना सन २०२४-२५ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत हिंगोली नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत मशिनरी पुरवठा करणे कामाची निविदा हिंगोली नगरपरिषदेकडुन मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजीत किम्मत १,३०,५०,३८१/- असुन सदर निविदेचा सविस्तर तपशील https://gem.gov.in या पोर्टलवर उपलब्ध आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा https://gem.gov.in या पोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या निविदा सुचनेनुसार राहिल

मुख्याधिकारी  
नगर परिषद, हिंगोली

**कार्यालय हिंगोली नगर परिषद हिंगोली, जि.हिंगोली**

फोन नं. (०२४५६) २२१७२७, फैक्स नं. (०२४५६) २२१७२७,  
E-mail:-mchhingoli@gmail.com  
विभागः- पापु/स्वच्छता जा.क्र ४५९/२०२४-२५ दिनांक २०/३/२०२५

**हिंगोली नगर परिषद, हिंगोली**  
**ई-निविदा २०२४-२५**

जा.क्र. पाणी/स्वच्छता/४५९/२०२४-२५  
दिनांक : २०/३/२०२५

ई-निविदा सुचना सन २०२४-२५ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० अंतर्गत हिंगोली नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पा अंतर्गत सिव्हील वर्क कामाची निविदा हिंगोली नगरपरिषदेकडुन मागविण्यात येत आहे. कामाची अंदाजीत किम्मत १,१०,७१,८४२/- असुन सदर निविदेचा सविस्तर तपशील www.mahatender.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा www.mahatender.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ई-निविदा सुचनेनुसार राहिल.

मुख्याधिकारी  
नगर परिषद, हिंगोली

**Format C-1**

**Declaration about criminal cases**

(As per the judgment dated 25th September, 2018, of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name and address of candidate : SANJAY KISHANRAO KENEKAR**  
**Name of political party : Bharatiya Janata Party**  
**Name of Election : The Maharashtra Legislative Council from the Assembly Member**  
**Name of Constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Member**

**I SANJAY KISHANRAO KENEKAR,** (name of candidate), a candidate for the above mentioned election, declare for public information the following details about my criminal antecedents :

**(A) Pending Criminal cases**

| Sl. No. | Name of Court | Case No. and dated | Status of case(s) | Section(s) of Acts concerned and brief description of offence(s) |
|---|---|---|---|---|
| 1. | XXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 9434/2020 FIR/291/2020 | Pending | U/s 188, 269 r/w 34 IPC |
| 2. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7844/2021 FIR No. 79/2021 | Pending | U/s 188 IPC |
| 3. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1688/2022 FIR No. 573/2021 | Pending | U/s 188, 269, 270 IPC |
| 4. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 7674/2022 FIR No. 654/2021 | Pending | U/s 269, 270 IPC |
| 5. | XX, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 2218/2022 FIR No. 192/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Management Act 51-b |
| 6. | XXIIth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 1450/2023 FIR No. 30/2022 | Pending | U/s 269, 270 r/w 34 IPC |
| 7. | XXIIth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 7859/2021 FIR No. 154/2021 | Pending | U/s 143, 188, 269, 270 IPC |
| 8. | XXIIth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 336/2021 FIR No. 450/2020 | Pending | U/s 143, 188, 269 Of IPC U/s. 59 of Disaster Management Act |
| 9. | IXth, J.M.F.C. Aurangabad | SCC No. 1479/2021 FIR No. 78/2021 | Pending | U/s 143, 147, 186, 188 of IPC |
| 10. | Matter IXth, J.M.F.C Aurangabad | SCC No. 4919/2023 FIR No. 671/2021 | Pending | U/s 269, 270 of IPC |

**(B) Details about cases of conviction for criminal offences**

| Sl. No. | Name of Court and date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment imposed |
|---|---|---|---|
| 1. | Nil | Nil | Nil |

**Place : Mumbai**  
**Date : 18/03/2025**

**Name & Signature of Candidate**  
**(SANJAY KISHANRAO KENEKAR)**

संपादकीय

तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# अनोखे अपरिचित मंदिर दर्शन अभियान

हिंदू धर्मात मंदिरांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. मंदिरे फक्त प्रार्थनेसाठीच नाहीत तर त्या ठिकाणी आत्म्याची शांती, दैवी ऊर्जा, संस्कृती संवर्धन, समाज जागृती, धार्मिक शिक्षण, परंपरेचे जतन आणि संरक्षण या बाबीसुद्धा होतात. मंदिरांचे महत्त्व विविध पद्धतींनी अधोरेखित करता येते. हिंदू धर्मात प्रत्येक देवी-देवतेचे विशिष्ट मंदिर आहे. ज्यात त्या देवतेचा आशीर्वाद मिळवण्यासाठी भाविक नियमितपणे जातात. मंदिर म्हणजे एक पवित्र स्थान आहे, जिथे भक्त चित्त एकाग्र करून ध्यान, पूजा आणि आरती करतात. यामुळे त्यांना दैवी ऊर्जा आणि शांती मिळते. मंदिरांमध्ये सामूहिक पूजा आणि उत्सवांचे आयोजन केले जाते. यामुळे समाजात एकता, प्रेम आणि बंधुभाव निर्माण होतो. मंदिरे धार्मिक कार्यक्रम आणि उत्सवांचे केंद्रबिंदू असतात, जे लोकांना एकत्र आणतात. येथे शिक्षण आणि तत्त्वज्ञान शिकवणारे ठिकाणही मंदिरच असते. तिथे विविध धार्मिक ग्रंथ वाचन, प्रवचने, कीर्तन आणि चर्चा होतात, ज्यामुळे भक्तांचे धर्मज्ञान वाढते आणि आध्यात्मिक विकास होतो. हिंदू धर्मात मंदिरांमध्ये प्रवेश करण्यापूर्वी शारीरिक आणि मानसिक शुद्धतेचा आग्रह ठेवला जातो. यामुळे भक्तांची आध्यात्मिक शुद्धता वाढते. मंदिराची वास्तुकला सुद्धा पवित्रतेचे प्रतीक मानले जाते. मंदिरे अनेकदा समाजातील गरजूंना मदत करण्यासाठी उपक्रमांचे आयोजन करतात. अनेक मंदिरांमध्ये अन्नदान तसेच मानसिक व शारीरिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. एकंदरीत, हिंदू धर्मात मंदिरे एक धार्मिक, सामाजिक आणि आध्यात्मिक केंद्र म्हणून काम करतात, जे लोकांना शांती, समृद्धी आणि जीवन जगण्याची उच्च मूल्ये साधण्यास मदत करतात. मात्र आपण सारे प्रसिद्ध मंदिरांच्या पाठीमागे धावतो, तिथे गर्दी करतो. अनेकदा गर्दीमुळे भक्तांना देवदर्शनही दुर्लभ होते. जी मंदिरे दुर्लक्षित आहेत, इतिहासाच्या पानांमध्ये दडलेली आहेत किंवा सुदूर आहेत, अशा मंदिरांकडे भाविक फिरकतही नाही. त्यामुळे हिंदू समाजाला प्रामुख्याने नव्या पिढीला मंदिरांशी जोडण्यासाठी, मंदिराबाबत जनजागृती व्हावी म्हणून तसेच मंदिरांना जीवनाच्या केंद्रस्थानी आणण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने रामनवमी (६ एप्रिल) ते भानुसप्तमी (२० एप्रिल) पर्यंतच्या काळात १ लाख अज्ञात मंदिरांशी संबंध प्रस्थापित करण्याची महामोहीम हाती घेतली आहे. यानिमित्ताने मंदिरांची गणना आणि पुजारी गणनेचाही कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. विश्व हिंदू परिषदेच्या मंदिर आणि अर्चक आयामातर्फे आयोजित या कल्पक अभियानाचे निश्चितच स्वागत करायला हवे.

प्रयागराज येथे नुकत्याच पार पडलेल्या महाकुंभमेळ्यात सुमारे ६० कोटी भाविकांनी गंगेमध्ये अमृतस्नानाचा आनंद घेतला. या कुंभमेळ्याबाबत जनताजनार्दनामध्ये प्रचंड उत्सुकता होती. त्यातही तरुणाईचा सहभाग लक्षणीय होता. तरुणांना केवळ कुंभाचे आध्यात्मिक महत्त्वच जाणून घ्यायचे नव्हते तर त्यांना गंगेतील पवित्र स्नानाची प्रचीतीही घ्यायची होती. एका सर्वेक्षणात हे ध्यानात आले की भारतीय तरुणाई प्रथमच इतक्या मोठ्या संख्येत आध्यात्मिक आणि धार्मिक उपक्रमाशी जोडली गेली. तरुणांनी कुंभात तर सहभाग नोंदविलाच पण देशातील इतर मंदिरे, त्यातील मूर्ती, मंदिरांचे महत्त्व, देवदर्शनाने होणारे फायदे, प्राप्त होणारी शांतता, चित्तशुद्धी, मिळणारी नवऊर्जा याबाबत जाणून घेण्याचा प्रयत्न केला. एक काळ असा होता की मेकॉलेच्या शिक्षणामुळे भरकटलेली तरुणाई मंदिरांकडे फिरकायला देखील तयार नव्हती. पण गेल्या काही वर्षांत देशातील बदललेल्या वातावरणामुळे तरुणाईत झालेले हे बदल दृष्टोत्पत्तीस पडत आहेत. याच ऊर्जावान तरुणाईला दिशा देण्यासाठी आणि त्यांचे मंदिरांशी घट्ट नाते जोडण्यासाठी विश्व हिंदू परिषदेने 'पाऊले चालती मंदिराची वाट' हा मंत्रजप करण्याचा निर्धार केला आहे. महाराष्ट्रातील १ लाख दुर्लक्षित, अपरिचित मंदिरांच्या दर्शनाचा निर्धार या निमित्ताने करण्यात आला आहे. मंदिरे ही ऊर्जाकेंद्रे व्हावीत असे प्रयत्न विश्व हिंदू परिषदेने यापूर्वीच सुरू केलेले आहेत. याअंतर्गत मंदिरांची स्वच्छता, प्रत्येक कुटुंबाने आठवड्यातून एकदा एखाद्या मंदिरात सहकुटुंब उपस्थित राहून तेथील धार्मिक कार्यात सहभाग नोंदविणे, मंदिरामध्ये महाप्रसादाचे आयोजन करणे, मंदिरांमध्ये शैक्षणिक मार्गदर्शन, मंदिरातील पुजाऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारणे, एका मंदिराला किमान एक गाय पाळण्याचा आग्रह, मंदिरांमध्ये आरोग्य शिबिरे, विविध प्रकारचे मार्गदर्शन, गरीब लोकांना मदत, परिसरातील एखाद्या गरजू व्यावसायिकाला आर्थिक मदत, निराधार, विधवांना आधार देणे, मंदिरामार्फत मानसिकरीत्या खचलेल्यांचे समुपदेशन, गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप, बचत गटातील महिलांना कापडी पिशव्या शिवण्याचे काम देणे, महाप्रसादासाठी नवख्या कॅटरर्सना तयार करणे, मोठ्या मंदिरांमार्फत शाळा-महाविद्यालयांचे संचालन, कुवतीनुसार रुग्णालयांची स्थापना, मंदिरांमार्फत समाजोपयोगी उपक्रमांना पाठिंबा, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन, राष्ट्रीय दिनी आणि विशिष्ट सण-समारंभांना मंदिरावर रोषणाई आणि मंदिरात प्राप्त झालेले दान सत्पात्री खर्च होईल, यावर जातीने लक्ष देण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. अपरिचित मंदिरांचे दर्शन हा उपक्रम त्याच योजनेचा पुढचा भाग आहे. या मोहिमेंतर्गत नवीन मंदिरांची ओळख समाजाला करून देणे, विस्मृतीच्या काळोखात दडलेल्या मंदिरांबाबत प्रकाशझोत टाकणे, आपल्या मंदिरांच्या स्मरणीय इतिहासाचे भान होऊन आत्मगौरवाची अनुभूती नवीन पिढीला करून देणे, मंदिरांप्रति आपल्या उदासीनतेची जाणीव होऊन त्यांच्या प्रति आपल्या कर्तव्याचे भान होणे, मंदिरांची देखभाल करणारे, पूजाअर्चा करणारे यांच्या सेवावृत्तीचे दर्शन होऊन त्यांच्याप्रति नतमस्तक होण्याची भावना निर्माण होणे आदी उद्दिष्टांची पूर्ती करण्याचे योजिले आहे.

या अभियानांतर्गत कोणत्याही मंदिरांना भेटी द्यायच्या, याचे काही नियम आणि अटीदेखील घालून देण्यात आल्या आहेत. या उपक्रमात सहभागी होणाऱ्या व्यक्ती किंवा परिवार यांनी किमान तीन अपरिचित मंदिरांना भेटी देणे अपेक्षित आहे. आपण कधीही ज्या मंदिरात गेलेलो नाही, भेट दिलेली नाही, दर्शन घेतलेले नाही अशा मंदिरांची भाविकांनी निवड करायची आहे. जुने, प्राचीन, वहिवाटीत नसलेले, जीर्णोद्धाराची वाट बघत असलेले मंदिर भेटीसाठी निवडले जाऊ शकते. हे मंदिर सुंदर, देखणे, उत्तम व्यवस्थापन असलेले किंवा नव्याने बांधलेलेही असू शकते. आपण ज्या शहरात अथवा गावात राहतो, त्याठिकाणी आपली वस्ती सोडून इतर वस्तीतील मंदिराची निवड केली जावी, अशी अपेक्षा आहे. सेवा वस्तीतील मंदिरे किंवा ज्या वस्तीत हिंदू अल्पसंख्येने आहेत अशा वस्तीतील मंदिरांच्या दर्शनाला जाण्याचीही आयोजकांनी अपेक्षा व्यक्त केली आहे. अभियानात सहभागी लोकांनी ज्या मंदिरांना भेटी दिल्या, त्या मंदिरांची छायाचित्रे काढून समाजमाध्यमांवर टाकायची आहेत. निश्चितच हा उपक्रम जनतेला, तरुणाईला मंदिर परंपरेशी जोडणारा आहे. यातून मंदिरांबद्दलची अनास्था तर दूर होणारच आहे, पण या चळवळीशी जोडल्या गेलेल्या लोकांचा परिचयही भाविकांना होणार आहे. मंदिरांचा इतिहास जाणून घेतला, त्या मंदिरांचे महत्त्व जाणून घेतले, त्या देवतेचे कार्य आणि तिची पूजा पद्धती, तिचे प्रमुख उत्सव जाणून घेतले तर निश्चितच नवी माहिती भाविकांना मिळू शकेल. दररोज ठरावीक वेळी त्या मंदिराचे दार कोण उघडते आणि बंद करते, काकड आरतीची परंपरा आहे का, मंदिरात होणारे धार्मिक कार्यक्रम, मंदिराचा इतिहास, मूर्तीचे माहात्म्य आदी माहिती मिळू शकेल. यातून दानशूर व्यक्तींना त्या मंदिराच्या दानासाठी प्रवृत्त करता येईल. ज्यांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे, ते स्वतःसुद्धा अशा मंदिरांसाठी दान-दक्षिणा देऊन तेथील सेवेकऱ्यांच्या परिस्थितीत सुधार आणू शकतील. पूजा-अर्चना करणारे गुरुजी तुटपुंज्या पगारावर काम करत असतील, तर त्यांनाही मदतीचा हात देता येऊ शकतो. मोठ्या दानशूर व्यक्ती संपूर्ण मंदिराचेच पालकत्व स्वीकारू शकतात. 'एकमेका साह्य करू, अवघे धरू सुपंथ' असे केले तर याचा लाभ या उपक्रमामुळे हिंदू समाजाला होणार आहे. पण त्यासाठी आपल्याला एक कदम मंदिर की ओर... असे म्हणत काही पावले देव, देश, धर्मासाठी टाकावी लागणार आहेत. ती टाकली जातील, अशी खात्री असल्याने माणसात देव पाहणाऱ्या उपक्रमाचा श्रीगणेशा करणाऱ्या विश्व हिंदू परिषदेला मनापासून शुभेच्छा देऊया!

## इतस्ततः

# कुंभमेळा आणि छावा

**डॉ. विवेक राजे**

या वर्षाच्या सुरुवातीपासून भारतात घडलेल्या दोन गोष्टींनी सगळ्या जगाचे लक्ष आकर्षित करून घेतले आहे.पहिली घटना म्हणजे प्रयागराज येथील दर १२ वर्षांनी येणारा आणि यावेळी १४४ वर्षांनी आलेल्या योगानेगाजणारा कुंभमेळा. दुसरेम्हणजेछत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील सध्या देशभरात गाजत असलेला 'छावा' हा चित्रपट होय. प्रयागराजला ६० कोटी हिंदू भाविकांनी भेट देऊन त्रिवेणी संगमात स्नान केले. हे हिंदू संस्कारांची मुळं किती खोलवर रुजलेली आहेत, याची साक्ष देणारे आहे. त्यामुळे 'डिसमेन्टलिंग हिंदुत्व' अशा मथळ्याखाली आंतरराष्ट्रीय कॉन्फरन्स घेणाऱ्या वोक विचारसरणीचे धाबे दणाणले आहे. त्यामुळेत्यांची इको सिस्टिम कामाला लागलेली दिसते आहे. त्याच वेळी या हिंदू मेळ्यामुळे तिथे झालेलीतीन लाख कोटींची आर्थिक उलाढाल जगाचे लक्ष वेधून घेत आहे. त्यातही यावेळी हिंदू व्यावसायिक, हिंदू संघटना, हिंदू तरुणाई आणि उत्तर प्रदेश सरकारद्वारे हिंदू व्यतिरिक्त इतरांना यातवाटा मिळणार नाही, याची घेतलेली खबरदारी कौतुक करण्याजोगीआहे.दरम्यान, दोन अत्यंत दुर्दैवी घटना घडल्या.दोन्ही वेळेस प्रशासनाने संवेदनशीलतेने कृती केली आणि पुन्हा अशी घटना घडू नये याची काळजी घेतली, हे नमूद केले पाहिजे. खरं तर५०-६० कोटी भाविकांनी कुंभमेळ्याला भेट देणे हेच जागतिक पातळीवर लक्ष वेधणारे आहे. निद्रिस्त आणि सुस्त असलेल्या हिंदू समाजानेजागृतीचा, एकतेचा हुंकार देणे हे अनेक जागतिक शक्तींना सहन होणारे नाही तसेच एवढ्या मोठ्या आर्थिक उलाढालीत आपला वाटा नगण्य आहे, हेयांच्या सहनशक्तीपलीकडचे आहे.

दुसरे म्हणजे नुकताच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील 'छावा' हा चित्रपट भारतात सर्वच प्रांतात गर्दी खेचून घेतो आहे. हा चित्रपट पाहून येणाऱ्या प्रेक्षकांच्या प्रतिक्रियाआतापर्यंत या देशात आपला अजेंडा चालवणाऱ्या डाव्या विचारसरणीच्या लोकांना सणसणीत चपराक देणाऱ्या आहेत. शाळकरी मुलांना 'आम्हाला हे काहीच शाळेत का शिकवले जात नाही'हा प्रश्न पडला आहे.महाविद्यालयीनविद्यार्थी 'हा इतिहास आम्हाला शिकवला नाही, हे आम्हाला माहितीच नव्हते' म्हणून संताप व्यक्त करीत आहेत. सर्वसामान्य माणसालाछत्रपती संभाजी महाराजांनी धर्म आणि हिंदवी स्वराज्य रक्षणार्थ दिलेल्या सर्वोच्च बलिदानाचे ज्ञान आणि जाणीव नव्याने होताना दिसते.धर्म, संस्कृती आणि स्वातंत्र्यासाठी संभाजी महाराजांनी काय किंमत चुकवली,याची जाणीवच आम्हाला होऊ दिली नाही. या चित्रपटाने ती जाणीव करून दिली. सिनेमाच्या अखेरच्या अर्ध्या तासात संभाजी महाराजांवर औरंगजेबाने केलेले शारीरिक अत्याचार पाहून प्रेक्षकांच्या डोळ्यात पाणी आले, असे मत भेटलेल्या प्रत्येकाने व्यक्त केले. हे त्या चित्रपटाचे जसे यश आहे, तसेच सत्य लपवून इतिहास लिहिण्याच्या साम्यवादी विचारसरणीला दिलेली चपराक आहे.



प्रसिद्ध कानडी लेखक डॉ. एस.एल.भैरप्पा यांनी त्यांनाएनसीआरटी राष्ट्रीय अभ्यासक्रम समितीत आलेल्या अनुभवाने'आवरण' ही ऐतिहासिक सत्यकथन करणारी कादंबरी लिहिली. ही कादंबरी लिहिण्याआधी त्यांनी 'खोट्या ऐतिहासिकगोष्टींच्या आधारे राष्ट्रवाद कधीही मजबूत होऊ शकत नाही' या शीर्षकाचा एक लेख लिहिला होता. त्यावर अनेकधर्मनिरपेक्ष विचारवंतांनी टीकाटिप्पणी केली. या तथाकथित विचारवंतांना उत्तर देण्यासाठी आणिमुस्लिमराज्यकर्त्यांनी हिंदूंवर केलेल्या अत्याचारांना लपवण्याच्या आपल्या देशातील वृत्तीवरत्यांनी दुसरा लेख लिहिला. या लेखाचे शीर्षकच 'इतिहासकारांनी कादंबरी लेखकासारखे स्वातंत्र्य घेतले तर सत्याचे काय होईल' असे होते. हा लेख २० मे २०१२ च्या 'फोक्स' या मासिकात प्रसिद्ध झाला होता. इतिहासहा वस्तुनिष्ठ पद्धतीनेच सांगणे व शिकवणे आवश्यक असते, असे या लेखात त्यांनी प्रतिपादन केले होते.आम्हाला एकात्मता असलेला देश निर्माण करायचा आहे, असेम्हणत खरा इतिहास लपवण्याचा उद्योग या देशातस्वातंत्र्य मिळाल्यापासूनच सुरू आहे. आजही या प्रकारच्या इतिहास शिक्षणामुळे अनेकांना या देशावरील इस्लामिक आक्रमणामागेधर्मविस्ताराची लालसा हे सर्वांतप्रमुख कारण होते हे माहिती नसते आणि मान्यही नसते. धर्म विस्तार हीच इस्लाम आणि ख्रिस्तीधर्मीयांनी जिथे गेले, तिथे केलेल्या अत्याचारांमागची प्रेरणा होती, हे या देशातील हिंदूंच्यालक्षात येऊ नये, यासाठी हे सगळे केले गेले. अन्यथाछत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावरील कोणतीही टीव्ही मालिका त्यांच्यावर औरंगजेबाने केलेले अत्याचार दाखविल्याशिवाय संपूच शकत नाही. या छत्रपतींच्याभूमीत मात्र ती तशी संपवली गेली.मुसलमानांना अल्पसंख्यक ठरवीत, विविध सवलती देत, इस्लामचा प्रच्छन्न प्रसार करण्याची मोकळीक देत आपली व्होट बँक मजबूत करण्याचे हलकट राजकारणया मराठी भूमीतच आकाराला येते, हे अगदी पाच-सहा वर्षांपूर्वी आपण अनुभवले. येथे मुळात हे मान्य केले पाहिजे की,आजही याच धर्म प्रसाराच्या प्रेरणेनेया दोन्ही धर्मांचे अनुयायी सतत कटकारस्थाने करीत असतात आणिसामान्य हिंदू माणसाच्या हे ध्यानीमनीदेखील नसते.'औरंगजेबसुफी संत होता'असे आता सांगितले जाताना दिसते. वास्तविक भारतातीलसुफी संत परंपराही इतकीच क्रौर्य आणि कत्तलींनी भरलेली आहे. मात्र, आमच्या समोर सुफी संतांची सामाजिक सौहार्द जपणारी प्रतिमाच सातत्याने ठेवली गेली आहे.असत्य इतिहासाच्यापायाभरणीवरसामाजिक एकात्मतेची इमारत उभी राहू शकत नाही, या सत्याकडे डोळेझाक करायची, हीच साम्यवादी विचारसरणी जगभरात जोपासली जात आहे.

दुर्दैवाने भारतीय शिक्षण व्यवस्था,इतिहास संकलन व संशोधन साम्यवाद्यांच्याच हातात सोपविले गेले. या देशाच्या काही भागात मागील ५०० वर्षे परकीय आक्रमकांचे राज्य होते. त्यांनी आपल्या सोयीच्या ऐतिहासिक नोंदी केल्या. अखेरची दीडशे वर्षे अत्यंत धूर्त आणि कारस्थानी इंग्रजी शासक होते. त्यांनी या समाजात फूट पाडणे आणि स्थानिक हिंदू राज्यकर्ते नाकर्ते होतेहे दाखविण्याच्या दृष्टिकोनातूनच इतिहासाचे लेखन करून घेतले. त्यांच्यानंतर आलेले नेहरूहेइंग्रजधार्जिणे होते. शिवाय त्यांना नेहरू खानदान कसेया देशाचे तारणहार आहे, हे सामान्यलोकांच्या मनात ठसवायचे होते. त्यामुळे त्यांनी इंग्रजाळलेला इतिहास देशापुढे येईल, अशी तजवीज केली.वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून इतिहासाचे लेखन करणारे इतिहासकार बाजूला सारण्यात आले तरसाम्यवादी इतिहासकारांची महत्त्वाच्या शैक्षणिक समित्यांवर वर्णी लावण्यात आली. परिणामतः मुस्लिम आणि ख्रिस्ती शासकांनी धार्मिक आधारावर केलेले अत्याचार लोकांपासून लपवले गेले.या नेमणुकांमागचा काँग्रेसी शासकांचा उद्देशही तोच होता. हिंदूंचे म्हणून जे काही असेल ते चूक,असे जनतेच्या मनावर बिंबवण्याचे हे प्रयत्न होते.मात्र, मुस्लिम शासकांचे चित्र हेच इतिहासकार जास्तीत जास्त उदात्त रंगवीत गेले. हे उदात्तीकरण, नव्हे रंगसफेदी, एवढी टोकाची होती की, पानिपत युद्धाच्या आधी आणि नंतरही जवळजवळ सगळा भारत मराठी आधिपत्याखाली होता, हे सत्य दडपण्यात आले. ऐतिहासिक नोंदी, त्यातही मोगलइतिहासकारांनी केलेल्या ऐतिहासिक नोंदी काही वेगळेच सांगत असताना, हे सगळे राजाश्रयामुळे म्हणजे गांधी-नेहरू परिवार व काँग्रेस यांच्या आशीर्वादाने साम्यवादी इतिहासकार करीत होते, हे लक्षात घेतले पाहिजे.

२०२५ च्या सुरुवातीलाच कुंभमेळ्याने पुन्हा एकदा या देशाची सांस्कृतिकएकात्मता अधोरेखित केली, तर 'छावा' चित्रपटाच्यानिमित्ताने मुस्लिम-मुघली शासकांचा आणि साम्यवादी इतिहासकारांचा खरा चेहरा जगासमोर आणला.


९८८१२४२२२४

## वेध

**नीलेश जोशी**

# भोंग्यांपासून होणारे ध्वनिप्रदूषण टाळा

भारतीय लोकशाहीचे चार स्तंभ आहेत. त्यात कायदे मंडळ, कार्यपालिका, न्यायपालिका आणि प्रसारमाध्यम यांचा समावेश आहे. न्यायपालिका अर्थात न्यायालय समाजहिताचा सर्वांगीण विचार करून निवाडा करीत असतात. न्यायालयाने दिलेल्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनाने करणे अपेक्षित आहे. हे सत्य असले तरी न्यायालयाचे अनेक निर्णय केवळ प्रशासनाच्या उदासीनतेमुळे अंमलात येत नाहीत, हे उघड सत्य आहे. ध्वनिप्रदूषण हे त्यातीलच एक. ध्वनिप्रदूषणाने अनेकानेक समस्यांमध्ये भर पडते. एकीकडे सर्वोच्च न्यायालयाने ध्वनिप्रदूषण होऊ नये म्हणून त्याचे डेसिबल अर्थात आवाजाचा स्तर निश्चित केला आहे. एवढेच नव्हे तर रात्री १० ते सकाळी ६ पर्यंत कुठल्याही लाऊडस्पीकरला बंदी असल्याचा निर्णय दिला, तर दुसरीकडे ठिकठिकाणी सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाची अवहेलना होत असल्याचे दिसून येते. याबाबत कारवाई करावी तरी कुणी?, प्रदूषण नियंत्रण मंडळाने की पोलिस प्रशासनाने असा प्रश्न उपस्थित होतो आणि ध्वनिप्रदूषणाची समस्या जैसे थे राहते. त्यातही बहुतांश भोंगे हे धार्मिक स्थळावर असल्याने पोलिस प्रशासनाची अनास्था दिसून येते. अनेक ठिकाणी तर विना परवानगी भोंगे वाजत असून आवाजाचा स्तराचा मुलाहिजा देखील केला जात नाही. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात बोलताना ध्वनिप्रदूषणाबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नियमांचा दाखला देत या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करणार असल्याचे म्हटले आहे. देवेंद्र फडणवीसांच्या या वक्तव्यानंतर ध्वनिप्रदूषणाचा त्रास असणारे अनेकजण सुखावले आहेत.



ध्वनिप्रदूषण हा तसा नेहमीच चर्चेत असणारा प्रश्न. असहनीय त्रास झाल्यानंतर काहींनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केल्या. या याचिकांवर न्यायालयाने निर्णय दिला. खरं म्हणजे अत्यंत कर्णकर्कश आवाजामुळे प्रत्येकाच्याच शारीरिक-मानसिक स्वास्थ्यावर परिणाम होतो. सोबतच रात्रीची शांतता भंग करणारा आवाजही स्वास्थ्यासाठी हानिकारकच. म्हणूनच सर्वोच्च न्यायालयाने याबाबत निर्णय देताना आवाजाची मर्यादा निश्चित केली. यासह रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत आवाजाला प्रतिबंध केला. एवढेच नव्हे तर न्यायालयाने रुग्णालय, शाळा-महाविद्यालये असलेल्या ठिकाणी शंभर मीटर परिघात 'शांतता क्षेत्र' असल्याचे घोषित केले. सण, उत्सवांची रेलचेल असणाऱ्या आपल्या देशात उत्सवांवर विरजण पडू नये म्हणून न्यायालयाने वर्षातले ४५ दिवस निर्बंधांवर सूट देण्याची मुभा त्या-त्या राज्य सरकारांना दिली. मात्र असे असूनही या कायद्याचे पालन होत नाही, हे दुर्दैवच.

नियमांचा भंग करीत विनापरवाना पहाटेच्या वेळी धार्मिक स्थळांवरील वाजणारे भोंगे, वेळी-अवेळी मध्यरात्रीनंतरही वाजणारे फटाके, रात्री दहानंतरही 'डीजे'चा होणारा दणदणाट, अशा प्रत्येक बाबतीत पोलिसांकडून कठोर कारवाई जोपर्यंत होत नाही तोपर्यंत कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ही दुरापास्तच आहे. सध्याच्या आधुनिक काळात 'डीजे'चा नागरिकांना सर्वाधिक त्रास होत असल्याने त्यावर बंदी आणण्याची मागणीही होऊ लागली आहे. त्यामुळे सरकारला त्याबाबतही निश्चित भूमिका घ्यावी लागणार आहे. वास्तविक, ध्वनिप्रदूषणाच्या नियमांचा भंग केल्यास शिक्षेची तरतूद असूनही आजपर्यंत याबाबत कारवाई झाल्याचे ऐकिवात नाही. एकीकडे राज्यभरात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी तेथील पोलिस अधीक्षक सर्वोच्च न्यायालयाचा दाखला देत गणेश उत्सवापूर्वी ध्वनिप्रदूषण कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याबाबतचे आदेश असल्याचे प्रसारमाध्यमांना गत काही वर्षांपासून कुळाचार असल्यागत नेमाने सांगतात.पण दुसरीकडे वर्षभर सकाळी ५.३० वाजता कर्णकर्कश आवाजात कुठल्याही आवाज मर्यादेचा विचार न करता वाजणारा भोंगा पोलिसांना दिसत नाही ही सापत्न वागणूक नाही का?तेव्हा सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाचे पालन का केले जात नाही? मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात दिलेल्या आदेशानंतर समाजातील बहुसंख्य असलेल्या पण सर्वोच्च न्यायालयाच्या ध्वनिप्रदूषणाबाबतच्या निर्णयाआड सतत अन्याय होणाऱ्या गटाच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. गणेशोत्सव आला की न्यायालयाच्या निर्णयाचा अंमलबजावणीचा देखावा करणाऱ्या पोलिस प्रशासनाला आता या पुढे सकाळी अवेळी वाजणाऱ्या भोंग्यांसह ध्वनिप्रदूषण करणाऱ्या प्रत्येकावर कारवाई करावी लागेल ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र

# भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष कधी मिळणार?

**श्यामकांत जहागीरदार**

दिल्ली विधानसभा निवडणूक भाजपाने जिंकल्यानंतर आणि बिहार विधानसभा निवडणुकीला जवळपास सातआठ महिन्यांचा कालावधी उरला असताना सर्वांचे लक्ष आता भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या निवडणुकीकडे लागले आहे. मार्च महिन्यात भाजपाला नवा राष्ट्रीय अध्यक्ष मिळेल, असे सुरुवातीला वाटत होते. पण आता या महिन्याच्या अखेरपर्यंत ही निवडणूक होईल असे वाटत नाही. त्यामुळे एप्रिल महिन्यात भाजपाच्या नव्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवडणूक होईल, असा अंदाज आहे. जगतप्रकाश नड्डा हे सध्या भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर नड्डा यांचा केंद्रीय मंत्री म्हणून मोदी यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला, आधी त्यांच्याकडेच असलेले आरोग्य आणि कुटुंब कल्याण खाते पुन्हा त्यांच्याकडे सोपवण्यात आले.

भाजपाच्या धोरणानुसार एका व्यक्तीकडे एकाच वेळी दोन महत्त्वाची पदे ठेवता येत नाही. पण नड्डा यांच्याकडे एकाचवेळी दोन नाही तर तीन महत्त्वाची पदे आहेत. नड्डा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष आहेत, सोबतच ते केंद्रीय आरोग्य मंत्री पण आहेत. याशिवाय राज्यसभेतील सत्ता पक्षनेते म्हणूनही त्यांच्याकडे जबाबदारी आहे. जानेवारी २०२० मध्ये नड्डा यांची भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून अमित शाह यांच्या जागेवर निवड झाली. सामान्यपणे भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाचा कार्यकाळ तीन वर्षांचा असतो. त्याहिशेबाने जानेवारी २०२३ मध्ये नड्डा यांचा कार्यकाळ संपणार होता. पण वर्षसव्वा वर्षातच म्हणजे २०२४ मध्ये लोकसभा निवडणुका होणार असल्यामुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला एक वर्षाची मुदतवाढ देण्यात आली. २०२४ मध्ये लोकसभा निवडणूक आटोपल्यावर भाजपाने नवा अध्यक्ष निवडणे अपेक्षित होते. पण दिल्ली विधानसभा निवडणुकीमुळे नड्डा यांच्या अध्यक्षपदाला पुन्हा मुदतवाढ मिळाली.

२०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी राजनाथसिंह भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपाने अमित शाह यांच्या अध्यक्षतेत लढवली. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी नड्डा भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष होते. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या वेळी भाजपाचे अध्यक्ष असलेल्या राजनाथसिंह यांचा नंतर मोदी यांच्या मंत्रिमंडळात गृहमंत्री म्हणून समावेश झाला, २०१९ ची लोकसभा निवडणूक भाजपाने अमित शाह यांच्या नेतृत्वात लढवली आणि जिंकली. मोदी यांनी गृहमंत्री म्हणून शाह यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. तिसऱ्या म्हणजे २०२४ च्या लोकसभा निवडणुकीनंतर मोदी यांनी नड्डा यांचा आपल्या मंत्रिमंडळात समावेश केला. याचाच अर्थ आतापर्यंत तीन राष्ट्रीय अध्यक्षांच्या नेतृत्वात भाजपाने लोकसभा निवडणूक लढवली, जिंकली आणि तिघांचाही नंतर मोदी यांच्या मंत्रिमंडळात समावेश झाला, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीलाही आता वर्ष होत आहे, पण अजूनपर्यंत भाजपाने आपला राष्ट्रीय अध्यक्ष निवडला नाही. म्हणजे नड्डा यांनी भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. भाजपाच्या घटनेप्रमाणे कोणताही अध्यक्ष सुरुवातीला तीन वर्षे आपल्या पदावर राहू शकत होता. २०१२ मध्ये भाजपाने केलेल्या घटनादुरुस्तीप्रमाणे कोणताही नेता सलग दोन कार्यकाळ म्हणजे सहा वर्षे भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्षपद भूषवू शकतो. नड्डा यांच्या अध्यक्षपदाची पाच वर्षे पूर्ण झाली असून सहावे वर्ष सुरू आहे. त्यामुळे येत्या महिना दोन महिन्यात भाजपाला आपला नवा राष्ट्रीय अध्यक्ष निवडावा लागणार आहे.

भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्याची एक प्रक्रिया आहे. सर्वांत आधी बुथ स्तरावरच्या निवडणुका होतात, त्यानंतर मंडल आणि शेवटी जिल्हा स्तरावरची निवडणूक प्रक्रिया पूर्ण केली जाते. बुथ ते जिल्हा पातळीपर्यंतची संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रदेश पातळीवरील संघटनात्मक निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण केली जाते. देशातील अर्ध्यापेक्षा जास्त राज्यांतील अध्यक्षांची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षाची निवड होऊ शकते. सध्या फक्त १३ राज्यांतील अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली आहे. येत्या काही दिवसांत केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेश अशा पाच राज्यांतील अध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईल, असे समजते. ओडिशा, कर्नाटक, हरयाणा आणि तेलंगणा अशा आणखी चार राज्यांतील अध्यक्षांची नावे जवळपास ठरली असल्याचे समजते. म्हणजे कोणत्याही क्षणी भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षाच्या निवडणुकीचा कार्यक्रम होऊ शकतो.

भाजपाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदासाठी काही केंद्रीय मंत्र्यांसह इतर नेत्यांच्या नावांची चर्चा आहे. केंद्रीय मंत्र्यांमध्ये मनोहरलाल खट्टर, शिवराजसिंह चौहान, धर्मेंद्र प्रधान आणि भूपेंद्र यादव यांच्या नावांची चर्चा आहे. भाजपात अध्यक्षाची निवडणूक असो वा मुख्यमंत्र्याची निवड ज्या नावांची चर्चा असते, ते त्या पदासाठी निवडले जातातच असे नाही. राजस्थान आणि मध्यप्रदेशात मुख्यमंत्रिपदासाठी ज्या नावांची चर्चा होती, ती नावे मागे पडून एकदम अनपेक्षित अशा नेत्याच्या गळ्यात मुख्यमंत्रिपदाची माळ पडली. विशेष म्हणजे या निवडीमुळे या पदाच्या शर्यतीत असलेल्या अन्य नेत्यांनाच धक्का बसला नाही, तर ज्यांची निवड झाली, त्यांनाही आपल्या निवडीने धक्का बसला होता. त्यामुळे राष्ट्रीय अध्यक्षपदाच्या शर्यतीत ज्या नावांची चर्चा आहे, त्यापैकी कोणी अध्यक्ष होईलच असे नाही. स्वप्नातही कोणी कल्पना केली नसेल असा एखादा नेता राष्ट्रीय अध्यक्ष झाला तरी आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. सध्या तर भाजपात एखाद्या पदासाठी आपल्या नावाची चर्चा व्हावी, असे कोणाला वाटतच नाही. कारण जी नावे चर्चेत असतात, ती त्यांची जमेची नाही तर नकारात्मक बाजू मानली जाते. चर्चेत असण्यामुळे फायदा नाही तर नुकसान होत असते. त्यामुळे भाजपातही कोणताही नेता पक्षाचा नवा राष्ट्रीय अध्यक्ष कोण होणार याबाबत कोणतेही मतप्रदर्शन करत नाही. भाजपाचे विद्यमान नेतृत्व आपल्या धक्कातंत्राच्या कार्यपद्धतीसाठी ओळखले जाते. त्यामुळे यावेळी एखाद्या महिलेचीही भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून निवड होऊ शकते. ओबीसी नेत्याच्या गळ्यातही राष्ट्रीय अध्यक्ष म्हणून माळ पडू शकते. भाजपात आतापर्यंत अनेक राष्ट्रीय अध्यक्ष झाले, पण यात एकही महिला अध्यक्ष झाली नाही. त्यामुळे नवी परंपरा वा पायंडा म्हणा भाजपा एखाद्या महिलेला राष्ट्रीय अध्यक्ष करण्याची शक्यता नाकारता येत नाही.

एप्रिलच्या दुसऱ्या आठवड्यात भाजपाचा राष्ट्रीय अध्यक्ष निवडल्यानंतर १८ एप्रिलपासून बंगळुरू येथे होणाऱ्या भाजपाच्या त्रिदिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या बैठकीत नव्या अध्यक्षाच्या नावावर शिक्कामोर्तब केले जाऊ शकते.

९८८१७१७८१७

### चिवचिवाट हरवण्याआधी

एखाद्या शांत सकाळी, चहा घेत असताना कानावर चिमण्यांचा गोडसर चिवचिवाट पडतो. घराच्या परसात, माडगिंतीच्या भिंतींवर, टाईल्सच्या छपरांमध्ये त्या अलगद विसावतात. त्यांच्या किलबिलाटाने सकाळ प्रसन्न होते. पण हे चित्र आता विरळ होत चालले आहे. पूर्वी सहजपणे खिडकीच्या गजांवर बसणाऱ्या चिमण्या आता दिसेनाशा होत आहेत. निसर्गाच्या या छोट्या जीवांचे अस्तित्व धोक्यात आले आहे आणि आपण मात्र या बदलाचा विचारही करत नाही.

चिमण्या केवळ गोड चिवचिवाट करीत नाहीत, तर त्या निसर्गाच्या आरोग्यदर्शकही आहेत. ज्या ठिकाणी चिमण्यांची संख्या अधिक असते, तेथे पर्यावरणाचा समतोल योग्य पद्धतीने राखला जातो. त्या शेतातील हानिकारक किडे खाऊन शेतीस मदत करतात. जर चिमण्याच नष्ट झाल्या, तर शेतीतील किड्यांचे प्रमाण वाढेल आणि शेतीला फटका बसेल. त्यामुळे त्यांचे अस्तित्व केवळ निसर्गासाठी नव्हे, तर माणसासाठीही तितकेच महत्त्वाचे आहे. आपल्या लहानपणी चिमण्यांच्या गोष्टी आजी सांगायची. अंगणात उडणाऱ्या चिमण्यांवरून बडबडगीतं तयार व्हायची. पण आज ती लहान मुलांच्या पुस्तकांपुरतीच उरली आहेत. भविष्यात ती चित्रांमधून, व्हिडिओंमधून किंवा केवळ आठवणीत राहिली तर? तो दिवस येण्याआधीच आपण काहीतरी करायला हवं. आपल्या घराच्या टेरेसवर, खिडकीच्या कोपऱ्यात किंवा अंगणात चिमण्यांसाठी अन्न-पाण्याची सोय करायला हवी. झाडे लावायला हवीत, त्यांची जोपासना करायला हवी. आज जागतिक चिमणी वाचवा दिवस! एक दिवस चिमण्यांचा विचार करण्याचा पण विचार पुरेसा नाही. कृती करायलाच हवी!

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

●● ●●

### मानवी मूल्यांना उजाळा देणारा नाथषष्ठी उत्सव

संतश्रेष्ठ एकनाथ महाराज यांच्यास्मरणार्थ नाथषष्ठी उत्सव पैठणयेथे दरवर्षी फाल्गुन वद्य षष्ठीला साजरा केला जातो. नाथषष्ठी उत्सव महाराष्ट्र राज्यातील सर्वांत मोठा उत्सव होय. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांनी आपले गुरू जनार्दन महाराज स्वामी यांच्या पुण्यतिथीनिमित्त आरंभ केला होता. संत एकनाथ महाराजांच्या जीवनात फाल्गुन वद्य षष्ठी हा दिन अत्यंत महत्त्वपूर्ण होता. कारण याच दिवशी स्वामी जनार्दन स्वामींचा अनुग्रह झाला, याच दिवशी त्यांना श्रीदत्तात्रेयांचे दर्शन झाले आणि याच दिवशी गुरुवर्य जनार्दन स्वामी महाराजांचे महापरिनिर्वाण झाले होते आणि विशेष म्हणजे फाल्गुन वद्य षष्ठी हाच दिवस संत एकनाथ महाराजांनी जलसमाधीसाठी निवडून जलसमाधी घेतली आहे. यास्तव पैठण येथे या दिवशी नाथषष्ठी यात्रा भरवून संत एकनाथ महाराजांच्या वाड्यापासून मोठी दिंडी काढली जाते. गावातून ही दिंडी गोदावरी नदीच्या पात्रात वालुकामय ठिकाणी जाते. या ठिकाणी चालत आलेल्या परंपरेनुसार भजन, भारुडे इत्यादी कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरे केले जातात. या ठिकाणी भक्त-भाविक संत एकनाथ महाराजांच्या जयघोषात रमून व गुंगून जातात. संतश्रेष्ठ एकनाथ महाराजांनी आपले संपूर्ण आयुष्यप्राणिमात्रावर दया करण्यासाठी, गोर-गरीब,दीन-दुबळ्यांच्या भल्यासाठी घालविले. काशीतीर्थ क्षेत्र येथून पवित्र जल अभिषेकासाठी आणलेल्या कावडीचे पाणीतहानलेल्या गाढवाला पाजले.तत्कालीन कर्मठपणाविरुद्ध त्यांनीमहाराचे पोरं उचलून कडेवर घेतले होते. श्राद्धासाठी केलेले जेवण गोरगरिबांना वाटून दिले होते. चिखलाच्या डबक्यातील डुकराच्या पिलाला मायेने बाहेर काढून उचलून घेतले होते. सद्गुरू जनार्दन स्वामी महाराज देवगिरी किल्ल्याचे किल्लेदार होते. त्यांची समाधी भंग होऊ नये म्हणून शत्रूशी त्यांनी हातात शस्त्र घेऊन मुकाबलाही केला होता. संत एकनाथ महाराज यांनी मूल्यांची जपवणूक केली, प्राणिमात्रांवर दया दाखवून त्या जीवांचीही मूल्ये जपली अशा मानवी मूल्ये जपणाऱ्या संतांच्या चरणी कोटी कोटी प्रणाम!

**धोंडीरामसिंह राजपूत**/९४२१३१२२४४

●● ●●

### विमानतळावरही कुत्र्यांची दहशत

नागपुरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळावर पाहुण्यांना आणण्यासाठी किंवा सोडण्यासाठी जायचे असल्यास तुम्हाला तुमची कार पार्किंगमध्ये ठेवून साधारण अर्धा किलोमीटर पायी चालत जावे लागते. विमानाचे आगमन ज्या भागाकडे होत असते त्याच्या दिशेने श्वानांचा मुक्त संचार बघायला मिळतो. आगमन टर्मिनलच्या अगदी समोर उपाहारगृह आहे. ग्राहकांच्या प्लेटमधील उरलेले खाद्यपदार्थ कुत्र्यांना दिले जात असल्याने उपाहारगृहाच्या आसपास कुत्र्यांचा घोळका सतत उभा असतो. त्यामुळे त्यांना पार करून समोर जाणे हे फार कठीण काम आहे. तुमच्या हातात पिशवी, डबा किंवा पाण्याची बाटली असेल तर त्यावर कुत्र्यांची नजर असते. काही दानशूर, प्राण्यांवर प्रेम करणारे या कुत्र्यांना बिस्किटे खाऊ घालतात. बिस्किटे मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू झाल्यावर ही कुत्री एकमेकांवर जोरजोराने भुंकायला लागतात. त्यांचा भुंकण्याचा आवाज विमानतळाच्या बाहेरील शेडमध्ये परावर्तनामुळे अनेकपटींनी वाढतो. येणारे पाहुणे किंवा त्यांच्या स्वागतासाठी जाणाऱ्यांवर कुत्र्यांनी हल्ला केला तर काय होईल,याची कल्पना करवत नाही.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

## वाचक पत्रे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स अॅप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# बँकांनी संवेदनशीलतेने कर्ज प्रकरणे मंजूर करावीत- जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया



अहिल्यानगर, दि. २०- शासनमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या लाभार्थ्यांना तसेच शेतकऱ्यांना कर्ज वाटपामध्ये प्राधान्य देत बँकांनी संवेदनशीलतेने अधिकाधीक कर्ज प्रकरणे मंजूर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्हास्तरीय बँकर्स समितीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी रिझर्व बँकेचे प्रतिनिधी राजेंद्र कनीशेट्टी, जिल्हा अग्रणी बँक अधिकारी आशिष नवले, नाबार्डचे जिल्हा व्यवस्थापक विक्रम पठारे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक अतुल दवंगे, उपजिल्हा निबंधक गणेश पुरी, पशुसंवर्धन उपायुक्त सुनील तुंभारे आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, शासकीय विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांच्या कर्जांची प्रकरणे बँकांकडे संबंधित विभागामार्फत पाठविण्यात येतात. अशी कर्ज प्रकरणे मंजूर करण्याच्या प्रक्रीयेत विलंब लागत असल्याचे निर्दर्शनास आले आहे. बँकांमध्ये प्रलंबित असलेले अर्ज तातडीने निकाली काढण्यात यावेत. सुटीच्या दिवशी बँकांमध्ये कर्ज प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करत अर्जांची असलेली प्रलंबितता संपविण्यात यावी, अशा सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी दिल्या. लाभार्थ्यांनी कर्जासाठी सादर केलेले अर्ज किरकोळ असलेल्या त्रुटी अभावी नाकारू नयेत. अर्जामध्ये त्रुटी नसतानाही अर्ज नाकारल्यास त्याची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात येईल, असेही ते म्हणाले.

जिल्ह्यात बचतगटांचे काम अत्यंत चांगले आहे. बचतगटातील महिलांना विविध उद्योगाच्या उभारणीसाठी मागणीनुसार कर्ज उपलब्ध करून देण्यात यावे. ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्थेमार्फत बचगटातील महिलांना कर्ज प्रकरणे कशा पद्धतीने सादर करावीत याबाबतचे प्रशिक्षणाचे आयोजन करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केल्या. यावेळी पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, प्रधानमंत्री मुद्रा योजना, सीएमईजीपी, पीएमईजीपी, एमएसआरएलएम, पी. एम विश्वकर्मा यासह ईतर विभागामार्फत कर्ज पुरवठ्यासाठी दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचा आढावा घेण्यात आला. तसेच यावेळी जिल्हा पत आराखडा २०२५ चे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. बैठकीस जिल्ह्यातील विविध बँकांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# जितो लेडीस विंग तर्फे फुलांच्या होळीला प्रतिसाद



छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी – जितो लेडीज विंग तर्फे नेहमी सामाजिक व जनकल्याणकारी उपक्रम राबविले जातात. याच अंतर्गत महिला दिवसाचे व होळीचे औचित्य साधुन देवडा फार्म हाउैस येथे फुलांच्या कलर चा होळीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विविध मनोरंजन कार्यक्रम सुध्दा घेण्यात आले होते. यामध्ये फुलांची होळी, विविध प्रकारचे खेळ, अंताक्षरी, सेल्फी कॉर्नर, हाउैजी, नृत्य संगीत, आदी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी महिलांनी एकमेकांवर फुल व फुलांचे कलर व रंगेबीरंग एकमेकांना लावुन गाण्याच्या तालावर नृत्य सादर करैन होळीचा आनंद लुटला. हा कार्यक्रम चार तास चालला होता. यामध्ये ९० महिलांची उपस्थिती होती. यावेळी पुरस्कार देण्यात आला. यावेळी जितो महाराष्ट्र अध्यक्षा डिंपल पगारीया, अनुपमा दगडा वीना गादीया देवडा फाम चे सचालक यांचे सुध्दा या कार्यासाठी सहकार्य मिळाले.

कार्यक्रमाचे सयोजक भारती पगारीया हया होत्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्षा प्रिया मुथा, उपाध्यक्ष रीतू जैन, प्रिती बाकलीवाल, सचिव सोनल जैन, सहसचिव सपना मुथियान, सारिका सेठी, कोषाध्यक्ष डॉ.प्रियंका संघवी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमासाठी संपुर्ण जितो लेडीज विंगच्या सदस्या उपस्थित होत्या.

## जाहीर प्रगटन

**मा. सहदिवाणी न्यायाधिश साहेब व. स्तर न्यायालय गंगापुर जि. औरंगाबाद**

नियमीत दिवाणी दावा क्र.२०७/२०२५

वादी : १) कृष्णा कोंडीराम पुरे, वय ५९ वर्षे, धंदा शेती, २) सुभाष कोंडीराम पुरे, वय ५५ वर्षे, धंदा शेती, दोघे रा. महेबुबखेडा ता. गंगापुर जि. औरंगाबाद

विरुध्द

प्रतिवादी : महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, औरंगाबाद

प्रकरण : दिवाणी मृत्यु जाहीर करणे बाबत.

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात वादी यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. डि. के. तारु यांच्या मार्फत दावा सादर केला आहे की, कोंडीराम उर्फ कोंडीबा कान्हु पुरे यांनी गेंदाबाई हिच्याशी विवाह केलेला होता मात्र त्यांना अपत्य न झाल्याने कोंडीराम यांनी आसराबाई हिच्याशी विवाह केला असता त्यांना वादी यांच्यासह अन्य मुली नामे कलाबाई, काशाबाई व सखुबाई ही अपत्ये झाली. कोंडीराम, आसराबाई व कलाबाई या आजरोजी हयात नाहीत. सन १९८६ मध्ये वादींचे वडील कोंडीराम यांनी गंगापुर येथील दिवाणी दाव्यातील तडजोडीनुसार गेंदाबाई हिस २ हे. ०२ आर. शेत जमिन दिल्यावरुन तिच्या नावे फेरफार क्र. १५६ मंजुर झाला होता मात्र त्यानंतर एप्रिल १९८७ मध्ये गेंदाबाई हिने घर सोडल्यानंतर तेव्हापासुन ती हयात असल्याचे कोठेही ऐकीवात नाही. वादी तसेच कोंडीराम, आसराबाई आणि गेंदाबाई यांचा भाऊ भावलाल कुकलारे यासर्वांनी शोध घेऊनही ती न आढळुन आल्याने वादींसह कोंडीराम, आसराबाई व कचरु बडोगे यांच्याविरुध्द संशय व्यक्त करुन भाऊलाल कुकलारे यांनी शिल्लेगाव पोलीस स्टेशन मध्ये मिसींग तक्रार क्र.०२/१९८७ दाखल केली होती. ज्यात वादीसह वरील सर्वांना अटक करुन दिनांक १२/०७/१९८७ रोजी गंगापुर येथील मे. प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी न्यायालयात हजर केले असता त्यांना दिनांक १६/०७/१९८७ पावेतो पोलीस कोठडी दिल्यानंतर त्यांची दिनांक १६/०७/१९८७ रोजी जामिनावर मुक्तता झाली होती.

तरी देखील गेंदाबाई ही आढळुन न आल्याने भाऊलाल कुकलारे यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठामध्ये भारतीय संविधानाचे अनुच्छेद १४ व २२६ नुसार याचिका दाखल केली होती मात्र त्याचा काहीही उपयोग झाला नाही. तरी देखील गेंदाबाई ही सन १९८७ मध्ये मिसींग नोंद झाल्यापासुन आढळुन आलेली नाही. यावरुन गेंदाबाई ही गेल्या ०७ वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासुन म्हणजेच १९८७ पासुन आजपावेतो असे एकुण ३७ वर्षांमध्ये हयात असल्याचे ऐकीवात नाही. मात्र गेंदाबाई हिच्या नावे असलेल्या गट नं.१०७ मौजे महेबुबखेडा येथील शेत जमिनीसंबंधी व्यवस्थापनाकरीता वादींना गेंदाबाई हिचे मृत्युपत्र आवश्यक असल्याने त्यांनी या दाव्याद्वारे गेंदाबाईचा दिवाणी मृत्यु झालेला असल्याचे जाहीर करुन मिळणे कामी विनंती केलेली आहे.

त्याअर्थी तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, वादींच्या प्रस्तूत दाव्यातील मागणीस कोणाचा काही आक्षेप–उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप, उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा, मुद्‌तीनंतरचा आक्षेप, उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय वादींच्या हक्कात त्यांनी मागणी केल्याप्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानिशी आज दिनांक २०/३/२०२५ रोजी दिले. प्रकरणात पुढील तारीख दिनांक २१/०६/२०२५ रोजीची आहे.

कनिष्ठ लिपीक — अधिक्षक

दिवाणी न्यायालय व. स्तर गंगापुर

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि.अर्ज क २५८/२०२५

अर्जदार : १) तुळशिराम तुकाराम धुमाळ, वय. ६३ वर्षे, धंदा. शेती, रा. खादगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ह.मु. सुरेवाडी, हर्सल, औरंगाबाद २) हरीचंद्र तुकाराम धुमाळ, वय. ६० वर्षे, धंदा. शेती, रा. खादगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) भाऊसाहेब तुकाराम धुमाळ, वय. ४० वर्षे, धंदा. शेती, रा. खादगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) कमलबाई अशोक थोरात, वय. ५५ वर्षे, धंदा. शेती, रा. खडक नारळा ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरूध्द

गैरअर्जदार : निंरक

प्रकरण : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, तुकाराम दादा धुमाळ हे खादगांव ता. गंगापूर येथील कायमचे रहीवासी होते ते दि. ०७//१२/२०२३ रोजी खादगांव ता. गंगापूर येथे मयत झाले असून त्यांच्यापुर्वी त्यांच्या पत्नी नामे सुलाबाई तुकाराम धुमाळ हया दि. १६/०६/२००३ रोजी मरण पावले आहेत. मयत तुकाराम दादा धुमाळ सुलाबाई तुकाराम धुमाळ यांची अर्जदार क. ४ ही मुलगी असून अर्जदार क. १ ते ३ हे मुले आहेत. मयतांना अर्जदारां व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत तुकाराम दादा धुमाळ सुलाबाई तुकाराम धुमाळ यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.

त्याआर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जास व अर्जातील मागणीस कोणाचा काही आपक्षेप उजर असल्यास सबंधीतांनी त्यांचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाच्या आत नांदवावा, मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतले जाणार नाहीत. व हे न्यायलयत अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपात्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

लिपिक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर

# संत मुक्ताईच्या भूमिकेसाठी नेहाने घेतले वाणी प्रशिक्षण

मुंबई – भूमिकांच्या जवळ जाताना या कलाकारांना खूप मेहनत घ्यावी लागते. त्यातही ती भूमिका आव्हानात्मक असेल तर जबाबदारी अधिक वाढते. दिग्पाल लांजेकर लिखित–दिग्दर्शित 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या चित्रपटातून अभिनेत्री नेहा नाईक हा युवा चेहरा भेटीला येणार आहे. या चित्रपटातील संत मुक्ताईची भूमिका ती साकारणार आहे. 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' हा भव्य मराठी चित्रपट १८ एप्रिलला आपल्या भेटीला येतोय. रेश्मा कुंदन थडानी यांनी या चित्रपटाची निर्मिती केली असून चित्रपटाची प्रस्तुती ए.ए.फिल्म्स ही नामांकित वितरण संस्था करीत आहे.

नेहा नाईक ही अभिनेत्री पुण्यामध्ये रंगभूमीवर अतिशय उत्तमरीत्या कार्यरत आहे. आता 'संत ज्ञानेश्वरांची मुक्ताई' या एका वेगळ्या विषयावर तितक्याच ताकदीची भूमिका साकारताना नेहाने आपल्या देहबोली सोबत वाणी संस्काराचे खास प्रशिक्षण पुण्यातील ज्येष्ठ नाट्यगुरू प्रा. श्यामराव जोशी यांच्याकडे तब्बल तीन महिने घेतले.

**Format C-2**

**Declaration about criminal antecedents of candidates set up by the party**

(As per the judgment dated 25th September, 2018 of Hon'ble Supreme Court in WP (Civil) No. 536 of 2011 (Public Interest Foundation & Ors. Vs. Union of India & Anr.)

**Name of Political Party : Bharatiya Janata Party**

***Name of Election : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members**

**Name of State/UT : Maharashtra**

| 1 | 2 | 3 | 4 | | 5 | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Name of Constituency | Name of Candidate | (A) Pending Criminal Cases | | (B) Details about cases of conviction for criminal offences | | |
| | The Maharashtra Legislative Council from the Assembly Members | SANJAY KISHANRAO KENEKAR | Name of Court, Case No. & status of the case(s) | Sections of the Acts concerned & brief description of offence(s) | Name of Court & date(s) of order(s) | Description of offence(s) & punishment imposed | Maximum Punishment Imposed |
| | | | XXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 9434/2020 Pending | FIR/291/2020 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188,269 r/w 34 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7844/2021 Pending | FIR No. 79/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 1688/2022 Pending | FIR No. 573/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 188, 269,270 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7674/2022 Pending | FIR No.654/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269,270 IPC Negligent acts like to spread infection of disease etc. | Nil | Nil | Nil |
| | | | XX, J.M.F.C. Aurangabad SCC No. 2218/2022 Pending | FIR No. 192/2021 MIDC CIDCO Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC. Disaster Disobedience Order of Public Servant Management Act 51-b | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth, J. M.F.C Aurangabad SCC No. 1450/2023 | FIR No. 30/2022 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 269,270 r/w 34 IPC Negligent acts like to spread infection of disease etc | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 7859/2021 Pending | FIR No. 154/2021 Pundlik Nagar Police Station Aurangabad U/s 143, 188, 269, 270 IPC Disobedience Order of Public Servant | Nil | Nil | Nil |
| | | | XXIIth J.M.F.C. Aurangabad SCC No. 336/ 2021 Pending | FIR No. 450/2020 City Chowk Police Station Aurangabad U/s 143,188, 269 Of IPC U/s. 59 Disobedience Order of Public Servant of Disaster Management Act | Nil | Nil | Nil |
| | | | IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 1479/ 2021 Pending | FIR No. 78/2021 MIDC Waluj Police Station Aurangabad U/s 143, 147, 186, 188 of IPC Disobedience Order of Public Servant & Violating of Prohibitory Order | Nil | Nil | Nil |
| | | | Matter IXth, J.M.F.C. Aurangabad SCC No. 4919/2023 Pending | FIR No. 671/2021 Kranti Chowk Police Station Aurangabad U/s 269,270 of IPC Negligent acts like to spread infection of disease etc. | Nil | Nil | Nil |

**Name of constituency : The Maharashtra Legislative Council from the Assembly Members**

Signature of office bearer of the Political Party
Name and designation...
**Chandrashekhar Bawankule**
**President**
**Bharatiya Janata Party, Maharashtra**

**Place : Mumbai**
**Date : 18.03.2025**

# आ.अर्जुनराव खोतकर यांच्याकडून जालन्यातील हजारो कोटींचा भूखंड घोटाळा उघडकीस

**चार सर्वे नंबरमधील व्यवहारावर महसूल मंत्र्याकडून बंदी**

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

बनावट दस्तावेज तयार करून, शासन आणि न्यायालयाची दिशाभूल करून शहरातील आबड कुटुंबीयांनी बोगस सर्वे क्रमांक ५५८ ५५९ आणि ५६० निर्माण करून हजारो कोटी रुपयांचा केलेला जमीन घोटाळा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी थेट विधानसभेतून एका लक्षवेधीद्वारे उघडकीस आणला आहे. दरम्यान, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या घोटाळ्याची गंभीर दखल घेत संबंधित चार सर्वेनंबर मधील सर्व व्यवहारावर बंदी आणत चौकशीचे आदेश दिले आहेत.

जालना शहरातील अंकित अभय आबड, अनसुल नरेंद्र आबड, आनंद नरेंद्र आबड आणि अनुप अशोक आबड यांचा हजारो कोटी रुपयांचा जमीन घोटाळा उघडकीस आणल्याने जिल्ह्यात सर्वत्र खळबळ उडाली आहे. आमदार खोतकर यांनी विधानसभेत या जमीन घोटाळ्याची सविस्तर माहिती सादर केली. आबड कुटुंबीयांनी ५५३ सर्वे नंबरमधील कुळाची असलेली जमीन बनावट दस्तावेज, बनावट पीआर कार्ड बनवून विकली. वास्तविक फाटक कमिशनने सदरील जमीन कुळाची असल्याचा अहवाल दिला होता. तो अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयातून गायब करण्यात आला होता. याच सर्वे नंबरमध्ये आबड वार्को वर्ल्ड नावाने आबड कुटुंब भूखंड विक्री करण्याच्या तयारीत होते. परंतु शासनाने फाटक कमिशनचा अहवाल मिळवून आबड वारको वर्ल्ड मधील बेकायदा व्यवहार थांबविण्यात यावे, अशी मागणी आमदार खोतकर यांनी केली. तसेच याच बनावट सर्वेनंबर ५५३ मधील आरक्षित जागेवर जे बांधकाम करण्यात आले आहे ते पाडण्याची नोटीसही जालना मनपाने दिल्याचे निर्दशनास आणून दिले.

### बोगस भूखंडविक्रीचे आबड कुटुंबावर गुन्हेही दाखल

सर्वे क्रमांक ५५८, ५५९ आणि ५६० हे खोटे बनावट दस्तावेज तयार करून निर्माण करण्यात आले आहेत. याबाबत आबड कुटुंबीयांनी दाखल केलेले मालकी हक्काचे सर्व दावे दिवाणी न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या संभाजीनगर खंडपीठाने फेटाळून लावलेले आहेत. तसेच २०२२ मध्ये तत्कालीन महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीही या चार बोगस सर्वे क्रमांकाची चौकशी करण्याचे आदेश दिले होते. न्यायालयाने सदर जमिनीचे मालकी हक्काचे सर्व दावे फेटाळून लावल्याने तसेच महसूलमंत्र्यांनी चौकशी लावल्याने आबड कुटुंबावर तालुका जालना पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल झाले होते. एवढेच नव्हे तर न्यायालयात दोषारोपपत्रही दाखल झालेले आहेत.



विधानसभेत अधिक माहिती देताना आमदार खोतकर यांनी महसूलमंत्र्यांच्या लक्षात आणून दिले की, सर्वे क्रमांक ५५८ ची चौकशी थांबविण्यात यावी अशी याचिका आबड यांनी न्यायालयात दाखल केली होती. त्यावेळी तत्कालीन उपविभागीय अधिकारी कल्याण यमाजी बोडखे यांनी न्यायालयात शपथपत्र दिले होते. या शपथपत्रात आबड यांनी जो सिलिंगचा तक्ता दिला होता त्यात ५५८,५५९ आणि ५६० या सर्वे नंबरचा उल्लेख नव्हता असे नमूद आहे. तसेच बनावट फेर, बनावट सातबारा, बनावट एनए ऑर्डर करून स्वतःची मालकी दाखवली होती. खोटी मालकी भासवून शेकडो लोकांना गंडविले असे शपथपत्रात नमूद केलेले आहे. दरम्यान शहरातील एक सामाजिक कार्यकर्ते वीरेंद्र धोका यांनीही आबड यांच्या जमीन घोटाळ्यासंबंधी पत्रकार परिषदा घेत आवाज उठविलेला होता.

### भूखंड खरेदी करणाऱ्यांना खोतकरांकडून अभय

दरम्यान ज्या सामान्य लोकांनी भूखंड खरेदी करून घरे बांधली त्या सर्वांना त्रास होऊ नये याची काळजी घेतली जाईल. त्यांनी घाबरण्याचे कारण नाही असेही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी स्पष्ट केले आहे.

### महसूलमंत्र्यांचे आदेश विधानसभेत

आमदार अर्जुनराव खोतकर यांनी हजारो कोटीचा जमीन घोटाळा उघडकीस आणल्यानंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आबड वार्को वर्ल्डसह चारही सर्वे नंबरमधील व्यवहारावर बंदी जाहीर केली आहे. त्यामुळे आजपासून कोणतीही मालमत्ता हस्तांतरित करता येणार नाही. खरेदीखत, ईसारपावती, फेर वगैरे कोणताही व्यवहार करता येणार नाही. तसेच शासनाची मोठी आर्थिक फसवणूक केल्यामुळे या रकमेचा बोझा आबड यांच्या इतर मालमत्तेवर टाकून तो वसूल करण्याचेही नमूद केलेले आहे. विभागीय आयुक्त आणि नोंदणी महानिरीक्षक यांना आदेशाची अंमलबजावणी करण्याची निर्देश दिले आहेत.

## संक्षिप्त



### ग्रामपंचायत कार्यालय तळणी येथे ग्राम दरबार सभा संपन्न

तभा वृत्तसेवा
तळणी/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी येथे बुधवार दि.१९ मार्च रोजी सकाळी १० वाजता ग्राम दरबार सभा कार्यक्रम सरपंच गौतम सदावर्ते व उपसरपंच विश्वनाथ दादा चंदेल यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

यावेळी या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सहायक गटविकास अधिकारी हरीभाऊ ताठे, पंचायत विस्तार अधिकारी बि.बि.चव्हाण,शिक्षण विभागाचे गट समन्वयक के.जी.राठोड,एकात्मीक बालविकास केंद्रामार्फत, तळणी गट समन्वयक श्रीमती सुखदेव,वेद्यकिय अधिकारी डॉ.वानखेडे, पशू वैद्यकीय अधिकारी बोथिंगे,उमेद बचत गटाचे आघाम,सर्व शाळेचे मुख्याध्यापक, कृषी विभागाचे कृषी सहायक खोडके , बांधकाम विभागाचे सुगंधे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी गावाच्या अडचणी बाबत ग्रामस्थांनी अनेक समस्या मांडल्या काही विभागाच्या वतीने ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण केले. मात्र महसुल चे अधिकारी आणि कर्मचारी साफ गैरहजर असल्याने सरकारने देऊ केलेल्या घरकुलासाठी लागणारी पाच ब्रास वाळू देणार कोण ? हा विषय या ग्राम दरबार सभेत तारांकित ठरला. व तलाठ्या कडुन ग्रामस्थांना काय काय अपेक्षा असते हे सर्वश्रुत आहे.यामुळे तलाठ्याने हजर रहायला पाहीजे होते मात्र तळणी गावचा तलाठी कोण असा प्रश्न ग्रामपंचायत सदस्य सुधाकर सरकटे यांनी मांडला.मात्र ही बाब ऐकुन घेण्यासाठी महसुल विभागाचे कोणिच हजर नसल्याचे निदर्शनास आले. यावेळी जिल्हा परिषद प्रशालेच्या गणित विषय शिक्षकांची अडचण सोडल्यास आपली शाळा एक नंबरवर आहे.मात्र हा विषय खुप दिवसांचा प्रलंबित आहे.तो सोडवावा म्हणजे शाळेच्या खाजगीकरणावर आळा बसेल व गोरगरीबांच्या मुलांना चांगले शिक्षण मिळेल अशी माहीती अरूण राठोड यांनी दिली. शिक्षण विभाग आणि कृषी विभाग सोडले तर बाकी विषयावर जोरदार ताशेरे ग्रामस्थाकडुन ओढण्यात आले. या कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत सदस्य करीम बापु पठाण,सुधाकर सरकटे, ज्ञानेश्वर येऊल, गणेश सदावर्ते, आशा सेविका,अंगनवाडी कार्यकर्ती,मदतनिस तथा ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा परिषद प्रशालेचे केंद्रप्रमुख गजानन मोरे यांनी केले तर आभार ग्रामसेवक आर.आर.डोईफोडे यांनी मानले. हा कार्यक्रम व्यवस्थित पार पडावा यासाठी ग्रामपंचायत कर्मचारी रमेशराव सरकटे,बबन सरकटे,केशव गुडघे, गोपाल सरकटे,विठ्ठल राठोड,विष्णु कांबळे यांनी मोलाचे परीश्रम घेतले.

### नगरसेवक दिपक पाटील वाकडे यांनी सुरू केल्या थंडगार शुद्ध पाण्याची पाणपोई




तभा वृत्तसेवा
जाफराबाद/प्रतिनिधी

जाफराबाद शहराचे माजी नगर पंचायत नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक जलसम्राट म्हणुन ओळख असलेले दिपक बाबुराव पाटील वाकडे यांनी उन्हाचा पारा चढत असताना तापमान हे ४० पर्यंत जात असल्या कारणाने दरवर्षी प्रमाणे जाफ्राबाद तालुक्यातील शहरासह तालुक्यात कामानिमित्त येणाऱ्या हजारो नागरिकांची, माता भगिनीची, शाळा, महाविद्यालयातील विद्यार्थी यांची तहान भागवण्यासाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक,बस स्टँड परिसर,वाकडे पाटील कॉम्प्लेक्स तहसील समोर या मुख्य ठिकाणी जाफराबाद तालुक्याच्या जडणघडणीत ज्यांचा सिंहांचा वाटा होता ते स्व.नत्थुदादा पाटील वाकडे,स्व.बाबुराव पाटील वाकडे,स्व.जानकाबाई वाकडे,स्व. लक्ष्मीबाई वाकडे, स्व.अरुण पाटील गायके यांच्या आठवणी पित्यर्थ शुद्ध थंडगार जारच्या पाण्याची पाणपोई सुरू केली केली आहे या पानपोईच्या उद्घाटन प्रसंगी विलास लोळगे, दिपक पा.वाकडे,गजानन दिक्षित टेलर, अंकुश पा.वाकडे, मोरे पाटील, सौगंन ठाकूर,आदित्य भोसले उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमाबद्दल नगरसेवक दिपक पाटील वाकडे यांचे सर्व स्तरातुन कौतुक होत आहे.

## कन्हैया नगर प्रकरणातील दोषींवर मोका अंतर्गत कारवाई करा!; मराठा क्रांती मोर्चा ची प्रशासनाकडे मागणी



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शहरातील कन्हैया नगर परिसरात असलेल्या छत्रपती संभाजी महाराज चौक येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांचे छायाचित्र असलेले बॅनर फाडणाऱ्या दोषींविरुद्ध मोका अंतर्गत कार्यवाही करावी अशी मागणी मराठा क्रांती मोर्चाच्या वतीने करण्यात आली आहे.

बुधवारी ( ता. १९) जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षकांची शिष्टमंडळाने भेट घेऊन चर्चा केली. दिलेल्या लेखी निवेदनात म्हंटले आहे की, दोन दिवसांपूर्वी समाजकंटकांनी दंगल होईल या उद्देशाने कट कारस्थान रचून शिवप्रेमी आणि तमाम हिंदूंच्या भावना दुखावण्याच्या हेतूने फ्लेक्स होर्डिंग्स तोडून लाथा मारून महापुरुषांचा अपमान होईल असे दुष्कृत्य केले आहे. जागृत नागरिकांच्या सतर्कतेमुळे घटनेतील संशयित पकडला असून अशा समाजकंटकांवर मोका अंतर्गत कार्यवाही करावी जेणेकरून यापुढे भविष्यात कुठल्याही समाजाच्या महापुरुषांची विटंबना करण्याची हिम्मत कोणी करणार नाही .अशी मागणी करण्यात आली आहे. यावेळी डॉ. संजय लाखे पाटील,गणेश राऊत, राजेश राऊत, विष्णू पाचफुले, प्रशांत वाढेकर, संजय देठे, अशोक पडूळ, गणेश मोहिते,इंजि.शुभम टेकाळे,मनोज गुळवे,प्रकाश घोडे पाटील, राम भुतेकर,ड. शैलेश देशमुख,आकाश जगताप, चत्रभुज शेजुळ, आयुष राठोड, पांडुरंग खैरे आदींची उपस्थिती होती.

## वैजनाथराव बोराडे यांच्यासह मंठ्याच्या नगरसेवकांचा भाजपात प्रवेश



तभा वृत्तसेवा
मंठा/प्रतिनिधी

मंठा शहराचे विद्यमान नगराध्यक्ष श्री वैजनाथ बोराडे, माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान नगरसेवक श्री नितीन राठोड, तसेच नगरसेवक श्री विकास सूर्यवंशी यांनी आज माजी मंत्री आमदार श्री बबनराव लोणीकर व भाजपा प्रदेश सचिव श्री राहुल लोणीकर यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

यावेळी मुख्यमंत्री श्री देवेंद्र फडणवीस, भाजपा महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण, आमदार श्री बबनराव लोणीकर, श्री राहुल लोणीकर यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा पार पडला. प्रसंगी पुष्पगुच्छ देऊन तसेच भारतीय जनता पक्षाचा रुमाल देत भाजपा कार्यकारी अध्यक्ष श्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते या सर्वांना पक्षप्रवेश दिला. यावेळी भाजपा मंठा तालुका अध्यक्ष सतीश निर्वळ जिल्हा परिषद सदस्य पंजाबराव बोराडे नगरसेवक शेषनारायण दवणे अमोल मोरे भाजपा ओबीसी मोर्चा तालुकाध्यक्ष रामकिसन बोडखे अभिजीत कोदंडे, उपनगराध्यक्ष अरुण वाघमारे नगरसेवक बाज खा पठाण नगरसेवक शेख साजिद नगरसेवक राजेश खंदारे सुजित जोगस प्रकाश घुले, गजानन उफाड यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

## खोट्या तक्रारी करून ग्रामपंचायतीची बदनामी करणाऱ्यांविरूध्द कारवाई करा; ग्रामस्थांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन

जालना (प्रतिनिधी) : खोटे आरोप करून प्रशासनाची दिशा भूल करत ग्रामपंचायत अकोली या स्वाइस्त संस्थेची खोट्या तक्रारी करून समाज माध्यमातून ग्रामपंचायतची बदनामी करणार्यावर कारवाई करण्यात यावी अशी मागणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

या संदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सार्वजनिक व वैयक्तिक विकासाची कामे मोठ्या प्रमाणात करण्यात आलेली असून अकोली शिवारामध्ये ग्रामपंचायतीने शेतकर्यांना शेतात जाण्यासाठी अडचणी येऊ नये म्हणून १३ पांदन रस्त्यापैकी १२ पांदन रस्त्यांचे बांधकाम पूर्ण केलेले आहे. तसेच एक रस्ता जो बाकी आहे त्या रस्त्याचे तक्रारदार सिद्धेश्वर सोळंके यांनीच काम आडवलेले आहे. सदर रस्त्याचे कामे ही दर्जेदार झाले असून शेतकर्यांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे. त्याचबरोबर शेतकर्याला शेतातील माल वाहतुकीसाठी कुठलीही अडचण राहिलेली नाही. अकोली ग्रामपंचायतीने डिजिटल अंगणवाडी बांधकाम, प्रशस्त प्ले ग्राऊंड, दर्जेदार सीमेंट रस्ते, स्मशानभूमी बांधकाम भूमिगत गटार, अश्या प्रकारच्या ग्रामपंचायत ने उत्कृष्ट दर्जेची कामे केली आहेत. याची पाहणी तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मिना यांनी पाहणी करून सर्व कामाची प्रशंसा केली आहे. अशी कामे जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीने करावीत असे आव्हान त्यांनी अकोली या गावातून प्रसार माध्यमातून केलेली आहे. त्याचबरोबर मागेल त्याला सिंचन विहीर, शेततळे, जिल्ह्यात मजुरांना सर्वात जास्त काम देणारी ग्रामपंचायत अकोली ग्रामपंचायत आहे. त्याची चौकशी होऊन सर्व कामे उत्कृष्ट दर्जेची झालेली आहेत असा अहवाल गट विकास अधिकारी पंचायत समिती, परतूर यांनी चौकशी करून दि. ५ जून २०२३ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केलेला आहे. त्या अहवालाची प्रत व कामाचे जिओ टॅगिंगचे फोटो देखील होते. स्वतः चा भ्रष्टाचार झाकण्यासाठी खोट्या तक्रारी देऊन उपोषणाला बसलेले आहेत. चोराच्या उलट्या बोंबा या म्हणी प्रमाणे कामात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ज्यांनी केले आहे. त्यांनीच स्वतःच्या बुडाखालील अंधार लपवण्यासाठी हा खोटा पराक्रम केला असून सिद्धेश्वर सोळंके यांचे वडील पांडुरंग सोळंके हे तात्कालीन जिल्हा परिषद सदस्य असतांना लघुसिंचन (जलसंधारण) विभागाच्या अकोली गावातील पाझर तलाव क्र. ०३ साठी महाराष्ट्र सरकारने संपादित केलेल्या ३ हेक्टर व ९५ आर जमिनीवर खोटे-नाटे कागदपत्र कोर्टात सादर करून अतिरिक्त मावेजा मिळवला आहे. आज रोजी पाझर तलावाची भिंत फोडून सर्व जमीन कसत आहे. यांच्या सर्व तक्रारी प्रशासनाला झाल्यामुळे प्रशासनाची दिशाभूल करण्यासाठी अश्या खोट्या तक्रारी अर्जदार सिद्धेश्वर सोळंके व गावातील गैरकायद्याचे मंडळी यांना हाताखाली धरून वेळोवेळी तक्रारी करत आहे. या पूर्वी त्याच्या गैरकायद्याचे मंडळी हाताशी धरून त्यांनी बर्याच तक्रारी केल्या होत्या त्या सर्व कामाची प्रशासना मार्फत चौकशी होऊन अहवाल शासन दरबारी उपलब्ध आहे. खोट्या तक्रारी करणार्यावर व ग्रामपंचायतची बदनामी करणार्यावर योग्य कारवाई करण्यात यावी अशी मागणी देखील या निवेदनात केली आहे. निवेदनावर रामेश्वर खुळे, सौ. पल्लवी सोळंके, सौ. कावेरा सोळंके, आकाश मोरे, सौ. गवळण गाते आदी ग्रामस्थांच्या स्वाक्षर्या आहेत.

## गोंदी पोलिसांची अवैध गोवंशाची जनावरे वाहतूक करणाऱ्यावर कारवाई

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी



दि १७ मार्च अंबड तालुक्यातील गोंदी पोलिसांना माहिती मिळाली की शहागडं येथे अवैध्य रित्या ०५ जनावरे वाहन क्रमांक चह २३ ु २२७१ यातून वाहतूक करीत आहेत मिळालेल्या माहितीवरून गोंदी पोलिस स्टेशन चे सपोनी आशिष खांडेकर, पोलीस उपनिरीक्षक किरण हावळे, पोलिस उप निरीक्षक इब्राहिम शेख, पोलिस हवालदार अशोक नागरगोजे, गणेश मुंढे यांनी वाहनावर छापा टाकून त्यातील विनापरवाना वाहतूक करण्यात येणारी ०५ गो वंशाची जनावरे यांची सुटका केली. सदरची ०५ गो वंशाची जनावरे ही दत्तधाम गोशाळा, कुरण येथे जमा केली आहेत. त्यात वाहन चालक नामें सद्दाम लालु कुरेशी राहणार नवगाव तालुका पैठण यास अटक करून माननीय न्यायालयासमोर हजर केले असून गुन्हाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक किरण हावळे करत आहे.

# शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना अटक करून राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत

*** नसता जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन *मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांचा बैठकीत निर्धार**

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना ताबडतोब अटक करून राजद्रोहाचे गुन्हे तात्काळ दाखल करावेत नसता जालना जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन करण्याचा निर्धार मराठा क्रांती मोर्चा आणि सर्व शिवप्रेमी संघटनांची बुधवार दि. १९ रोजी दुपारी २ वाजता मा. खा. भाऊसाहेब देशमुख सभागृह भाग्यनगर येथे बैठक घेवून करण्यात आला असल्याची माहिती आज घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत दिली. बैठकीच्या सुरवातीस इतिहासतज्ञ मा. म. देशमुख यांच्या निधनाबद्दल दुखः व्यक्त करून श्रध्दांजली वाहण्यात आली.

सदरील बैठकीमध्ये विविध निर्णय घेण्यात आले त्यामध्ये शिवद्रोही प्रशांत कोरटकर, राहुल सोलापूरकर यांना तातडीने अटक करून, राजद्रोहाचे गुन्हे दाखल करावेत आणि खटले फास्ट ट्रॅक कोर्टात चालवावेत.

शिवद्रोह्यांना राज्यसरकार जी ममत्वाची वागणूक देत आहे आणि त्यामुळे त्यांना राष्ट्रद्रोही गुन्हेगारासम कठोर कारवाई करत उचलून आणून अटक करत नाही, तसेच त्यांच्या पाठीमागील मास्टरमाईंडचा शोध घेत नाही किंवा त्यांच्या विरोधात कारवाई करत नाही ही वस्तुस्थिती आहे ! याच प्रवृत्तींनी अश्याच प्रकारे यापूर्वीसुध्दा राजमाता जिजाऊ, छत्रपती शिवाजी महाराज,



छत्रपती संभाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या संदर्भात सुध्दा असंस्कृत, विकृत, घाणेरडी विधाने केली होती परंतु राज्यसरकारने बोटचेपी भुमिका घेतल्यामुळे अश्या राष्ट्रद्रोही शक्तीचे मनोबल वाढले आहे म्हणून या गुन्हेगारावर कठोर कायदेशीर कारवाई करून त्यांचा कायमचा बंदोबस्त करून इतरांना जरब बसवावी. लक्ष्मण ऊत्तेकराने छावा मधे सुनियोजित विकृतीकरण केले आहे ते त्यांनी टाळायला हवे होते. शिर्के घराण्यांचा खोटा इतिहास दाखवला आहे आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या क्रूर मृत्यू ला कारणीभूत असलेल्या सल्लागार वर्गाचा सहभाग लपविला आहे / वगळला आहे म्हणून राज्याच्या प्रमुखांनी सिनेमा ची कथा म्हणजे ईतिहास नाही याचे भान ठेवून वक्तव्य करावीत आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या क्रूर मृत्यू ला औरंगजेब सह कुठल्या तत्कालीन धार्मिक शक्ती व सल्लागार जबाबदार आहेत त्याचेही सत्य जनतेसमोर आणले पाहिजे. सर्वसत्ताधीश मुघल बादशहा औरंगजेब याला झुंजवत झुंजवत याच महाराष्ट्र भुमित गाडला आणि मुघल सल्तनत खिळखिळी करून टाकली अश्या मुघलमर्दिनी रणरागिणी छत्रपती ताराराणी यांचे भव्य अश्वारूढ स्मारके मुंबईत मंत्रालयासह राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात ऊभे करावेत आणि त्यांचा फोटो मंत्रालय प्रवेशद्वार ते सर्व शासकीय कार्यालयात तातडीने लावावेत तसेच शालेय, महाविद्यालय, संशोधन अभ्यासक्रमात रणरागिणी ताराराणी चा शौर्याचा इतिहास समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यातून तरूण पिढीला प्रेरणा मिळेल. रणरागिणी छत्रपती ताराराणी व छत्रपती थोरले शाहू महाराज यांचे साता-यातील समाधीस्थळ उचित दर्जाचे बांधकाम करून शासकीय इतमामात पुजा दिवाबत्ती करणेचा निर्णय तातडीने करावा. नसता मराठा क्रांती मोर्चा महाराष्ट्र आणि शिवप्रेमी संघटना 'स्वराज्यसेवा' म्हणून श्रम'धन'दान करून ही दर्जेदार समाधीस्थळे उभारतील! महाराष्ट्र द्रोही बाबासाहेब पुरंदरे यांच्या स्मारकासाठी राज्यसरकार शेकडो करोड रू. देत आहे/दिले आहेत पण मुघलमर्दिनी रणरागिणी ताराराणी व छत्रपती शाहू महाराज थोरले याच्या स्मारकाची दुरवस्था सहनशक्ती च्या पलिकडे गेली आहे याची गंभीर नोंद घ्यावी. दिल्लीच्या तालकटोरा येथे मराठा विर पेशवा बाजीराव पहिला, श्रीमंत महादजी शिंदे, श्रीमंत मल्हारराव होळकर यांची स्मारके ऊभा करण्यासाठी ना. एकनाथराव शिंदे आणि मा. शरदचंद्रजी पवार यांनी सुचना केली आहे ती स्वागतार्ह आहे. परंतु त्यातून तत्कालीन छत्रपती शंभुपुत्र शाहू महाराज यांना वगळले जाते आहे हे अनाकलनीय असून मराठा इतिहासाची मोडतोड तर केली जात नाही ना? ताल कटोरा येथे छत्रपती शंभू पुत्र शाहू महाराज यांचाही छत्रपतीच्या इतमामामला साजेसे स्मारक ऊभे केलेच पाहिजे ही आमची आग्रही मागणी आहे.

आरेस्सेस प्रमुख मोहन भागवत आणि सावरकर स्मारक चे रणजित सावरकर यांना कायदेशीर नोटीस देऊन त्यांनी त्यांच्या विचारांच्या साहित्यातून छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, शिवशाही, स्वराज्य यासंदर्भात जे अनैतिहासिक, बेजबाबदार, बदनामीकारक लिखाण समाविष्ट आहे व वेळोवेळी प्रसिद्ध केलेले आहे/केले जात आहे आणि शौर्या ऐवजी असाच मजकूर इंटरनेट महाजाळातून जगभर जात आहे आणि या युगप्रवर्तक महापुरुषांची बदनामी होत आहे तरी तातडीने हा असा मजकूराचा भाग वगळण्यात यावा आणि पुढील आवृत्तीत समाविष्ट करू नये. नसता कायदेशीर, न्यायालयीन कारवाई केली जाईल.

या सर्व मागण्याचा राज्य सरकारने गांभीर्याने विचार करावा तसेच शिवद्रोही प्रशांत कोरटकर व राहुल सोलापूरकर यांना ताबडतोब अटक करून राजद्रोहाचे गुन्हे तात्काळ दाखल करावेत नसता जालना जिल्हयासह राज्याभरात तिव्र आंदोलन करण्याचा निर्धार करण्यात आला आहे! आणि यासाठी शुक्रवार दि. २१ एप्रिली २०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असून सोमवार दि. २४ मार्च २०२५ रोजी जिल्ह्यात ठिकठिकाणी रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहेत.

यावेळी डॉ. संजय लाखे पाटील, संतोष गाजरे, सुभाष कोळकर, अशोक पडूळ, जगन्नाथ काकडे, राजेंद्र गोरे, अरविंद देशमुख, संदीप ताडगे, काकासाहेब खरात, राम देठे, रवी वाडेकर, नरसिंग पवार, ज्ञानेश्वर माऊली ताकट, संजय देशमुख आदींची उपस्थिती होती.

# रोजगार मेळाव्याच्या माध्यमातूनच यशस्वी जीवनाची सुरुवात : डी.पी. सावंत

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठामध्ये पहिल्यांदाच रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यास विद्यार्थ्यांनीही भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी विद्यापीठाने हा एक चांगला पुढाकार घेतलेला आहे. कारण अशा रोजगार मेळाव्याच्या माध्यमातूनच विद्यार्थ्यांच्या यशस्वी जीवनाची सुरुवात होत असते, असे मत महाराष्ट्र राज्याचे माजी उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे राज्यमंत्री मा. डी.पी. सावंत यांनी व्यक्त केले.

ते आज दि. २० मार्च रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि नांदेड येथील जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याच्या उद्घाटन प्रसंगी बोलत



होते. यावेळी व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, कुलसचिव डॉ. डी.डी. पवार, व्यवस्थापन परिषद सदस्य नरेंद्रदादा चव्हाण, डॉ. हनमंत कंधारकर, कौशल्य विकास केंद्राच्या सहाय्यक आयुक्त रेणुका तमलवार, अरविंद कंग्रालकर, अधिष्ठाता डॉ. एम.के. पाटील, डॉ. पराग खडके, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. डी. एम. खंदारे, वित्त व लेखाधिकारी मोहमद शकील अब्दुल करीम यांची प्रमुख उपस्थिती होती.

या मेळाव्यास ३२०० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. स्पॉट नोंदणी मध्ये १२०० विद्यार्थी आले आहेत. असे एकूण जवळपास ४५०० विद्यार्थ्यांनी या रोजगार मेळाव्यामध्ये सहभाग घेतला आहे. या विद्यार्थ्यांना रोजगार देण्यासाठी जवळपास ५० कंपन्यांचे प्रतिनिधी मुलाखत घेण्यासाठी आलेले आहेत.

अध्यक्षीय समारोपात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, असे रोजगार मेळावे आयोजन करण्याची ही विद्यापीठाची पहिलीच वेळ आहे. येथून पुढे वर्षातून दोन वेळा नियमितपणे अशा रोजगार मेळाव्याचे आयोजन होणार आहे. त्यासाठी येणाऱ्या प्रत्येक कंपनीसोबत आपण सामंजस्य करार करणार आहोत. विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने येथे आलेल्या कंपन्यांना मुलाखत द्यावी आणि यशस्वी जीवनाची वाटचाल सुरू करावी, अशा शुभेच्छाही त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिल्या.

या मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. बालाजी मुधोळकर, प्रा. डॉ. बी सुरेंद्रनाथ रेड्डी, प्रा. डॉ. शैलेश वाढेर, प्रा. डॉ. कृष्णा चैतन्य, प्रा. डॉ. एल.एच. कांबळे, प्रा. डॉ. निना गोगटे, प्रा. डॉ. सुहास पाठक, प्रा. डॉ. अर्चना साबळे, प्रा. डॉ. योगेश लोलगे, प्रा.डॉ. महेश जोशी, प्रा. डॉ. काशिनाथ बोगले, प्रा. डॉ. राजकुमार मून यांनी परिश्रम घेतले आहे.

## संक्षिप्त वृत्त



### राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेत सूधा शिंदे यांची निवड

**भोकर**-पंजाब येथे होणाऱ्या सबज्यूनियर राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेत मंजूळाबाई किन्हाळकर मूलींचे विद्यालयात इयत्ता नववीत शिकणारी भोकरच्या सूधा शिंदे या खेळाडूची निवड करण्यात आली. दि.२७ मार्च ते ३१ मार्च या कालावधीत पार पडणाऱ्या राष्ट्रिय बेसबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राचा संघ संगरुर (पंजाब) येथे रवाना होणार आहे. या गूणवंत खेळाडूच्या निवडीबद्यल हौशी बेसबॉल असोशिएशन नांदेडचे अध्यक्ष प्रशांत अण्णा तिडके व उपाध्यक्ष नरसिंग अण्णा आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली खेळाडूची निवड झाली महाराष्ट्र बेसबॉल असोशिएशन सचिव राजेंद्र ईखनकर तांत्रिक समिती चेअरमन अशोक सरोदे हौशी बेसबॉल असोशिएशन नांदेडचे सचिव आनंदा कांबळे,बालाजी गाडेकर यांचे मार्गदर्शन लाभले संघटने तर्फे तसेच मंजूळाबाई किन्हाळकर मूलींचे विद्यालयाच्या मूख्याध्यापिका एस.एन. पाटील सहशिक्षक दिनेश मांजरमकर सह सर्व शिक्षक वृंद सूधा शिंदे हिची निवड झाल्याबद्यल जाहिर सत्कार करण्यात आला व राष्ट्रिय स्पर्धेसाठी खेळाडूंना शूभेच्छा देण्यात आल्या.

### तामसा येथे माकडाने चावा घेतल्याने महिला गंभीर जखमी

**तामसा**-तामसा येथील जुन्या गावात राहणारी महिला कपडे वाळवण्यासाठी छतावर गेली असता माकडाने त्यांचेवर अचानक हल्ला करून जबर चावा घेतल्याने त्या महिला गंभीर जखमी झाल्या असून पुढील उपचारासाठी महिलेला नांदेडला पाठवण्यात आल्याची खळबळजनक घटना दि. १८ रोजी मंगळवारी दुपारी तामसा जुन्या गावात घडली आहे. माकडाच्या दहशतीने महीला, लहान बालकांत भीतीचे वातावरण पसरलेले आहे. वन विभागाने माकडांचा तात्काळ बंदोबस्त करावा अशी मागणी पुढे आली आहे. तामसा गावातील जैन मंदिर परीसरातील अर्चना बालाजी गरड (वय ३८) ही महिला मंगळवारी दुपारी कपडे वाळवण्यासाठी घराच्या छतावर गेली होती. तेथे एका माकडाने त्यांच्यावर अचानक हल्ला करून त्यांना जबर चावा घेतल्याने त्या गंभीर जखमी झाल्या आहेत. आरडाओरड केल्यानंतर माकडाच्या तावडीतून त्यांची सुटका झाली. अर्चना गरड यांना तामसा प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारास पाठवले होते. तेथे प्राथमिक उपचार करुन त्यांना पुढील उपचारासाठी नांदेडला पाठवण्यात आल्याची माहिती आरोग्य सूत्राने दिली. माकडाच्या हल्लूयात महिला जखमी झाल्यानंतर अनेकांनी स्थानिक वनपाल व हदगाव वनपरिक्षेत्र अधिकारी यांना भ्रमणध्वनीवरून घटनेची माहिती दिल्याचे सांगण्यात आले. परंतु वनपाल, वनरक्षक किंवा वनपरिक्षेत्र अधिकारी यापैकी कोणीही घटनास्थळी पोहोचू शकले नाहीत. यावरून तामसा वन परिमंडळ वाऱ्यावर सोडण्यात आले की काय? असा प्रश्न सहाजिकच उपस्थित झाला होता. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन वन विभागाने पुढील अनर्थ टाळण्यासाठी माकडांचा वेळीच बंदोबस्त करावा. अशी मागणी पुढे आली आहे.

### नांदेडच्या बुद्धगया मुक्ती आंदोलन महामोर्चात सहभागी व्हावे

**भोकर**-बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात असलेले विहार राज्यातील महाबोधी महाविहार बौद्ध गया हे बौद्ध भिक्खू आणि बौद्ध धर्मी यांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी नांदेड येथे येत्या दि. २५ मार्च रोजी महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. नांदेड जिल्ह्यातील लाखो बौद्ध अनुयायी या मोर्चात सहभागी होणार आहेत. नांदेड जिल्ह्यातील समस्त भिक्खू संघ, भारतीय बौद्ध महासभा, समता सैनिक दल तसेच जिल्ह्यातल्या विविध आंबेडकरी राजकीय - सामाजिक संघटनांनी या महामोर्चाचे आयोजन केलेले आहे. बुद्धगया येथील महाबोधी महाविहार बुद्धविहार गेली वर्षांनवर्षे बौद्ध्यत्तरांच्या ताब्यात आहे. विशेषतः हिंदू धर्मीयांनी बुद्धविहाराचे व्यवस्थापनावर ताबा घेऊन मनमानी चालवली असून बुद्धिस्ट टेम्पल ॲक्ट १९४९ नुसार हा ताबा असल्याने बौद्ध धर्मीय भिक्खू आणि बौद्ध अनुयायींच्या न्याय हक्कावर गदा आणली आहे. महामोर्चा जिल्हाधिकारी कार्यालय नांदेड येथे पोहोचल्यानंतर महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन महामोर्चा आयोजकांच्या वतीने जिल्हाधिकारी नांदेड यांना मागणीचे निवेदन देण्यात येणार आहे. भोकर शहर आणि तालुका परिसरातून बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने मोर्चा सहभागी होणार आहेत.

### घरकुल मंजुर झाले पण लाभार्थ्यांना बांधकामासाठी वाळुच मिळेना

**हाणेगाव**-सर्वांना हक्काचे घर मिळावे यासाठी शासनाने महाराजस्व अभियानांतर्गत दारिद्रय रेषेखालील तसेच आर्थीक व सामाजिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांसाठी आवास योजना आमलात आणली आहे या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी प्रती पाच ब्रास वाळु देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता.या निर्णयानुसार जिल्हा प्रशासनाने तालुक्यातील घाट राखीव ठेवले पण मागील दोन महीण्यापासुन वाळु घाट चालु नसल्याने आनलाईन केलेल्या लोकांना याचा त्रास होत आहे आणि लाभार्थी या योजनेपासुन वंचीत राहत आहेत.लोकांना थोड्या पैशात वाळु मिळत नाही याचे दर तर अव्वाच्या सव्वा झाल्या आहेत यामुळे आनेक लाभार्थ्यांचे घर बांधकाम थांबले आहेत काहींनी याचा पर्याय म्हणुन क्रशरचा वापर करीत आहेत वाळुच्या दरात दिवसेंदिवस वाढ होत असल्यामुळें सर्वसामान्यांना वाळु खरेदी करणे कठीण झाले असुन बांधकाम करावं तरी कसे हा प्रश्न? पडला आहे.बऱ्याच लाभार्थ्यांना खात्यावर थोडेफार पैसे पडले आहेत उर्वरीत रक्कम पुढील कामाच्या स्वरुपावरुन दिली जाते आहे.मग वाळुच नाही तर बांधकाम कसे करायचे आणि उर्वरीत रक्कम उचलायचे कसे असा प्रश्न लोकांना पडला आहे म्हणुन आनेक लोकांचे घर बांधकामाचे स्वप्न भंग तरी होणार नाहीत ना? अशी चर्चा लाभार्थी करीत असताना दिसते आहे.



**भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह करून ऐतिहासिक क्रांती केली आहे. ही घटना कायमस्वरुपी स्मरणात रहावी यासाठी २० मार्च हा दिवस 'राष्ट्रीय जलदिन' म्हणून घोषित करावा या मागणीसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महेंद्र पिंपळगावकर यांच्या नेतृत्वाखाली धरणे आंदोलन करून निवासी उप जिल्हाधिकारी महेश वडदकर यांना मागण्यांचे निवेदन देण्यात आले. यापसंगी सुभाष काटकांबळे, भगवान गायकवाड, बापूसाहेब सावंत, राजू लांडगे, रवि गायकवाड, सुनिल खिल्लारे, रवि गोयल, सिद्धार्थ महागडे, शिलरत्न वाघमारे, श्रीरंग गायकवाड, मोहम्मद जुबेर, मिर्झा शहजाद, सतिश बनसोडे व इतर**

# समृद्ध ऐतिहासिक स्थळांच्या संरक्षणासाठी प्रत्येक नांदेडकरांनी पुढे यावे : राहूल कर्डिले

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**

शिलालेखा पासून किल्ल्यापर्यंत आणि मंदिरांपासून कलात्मक बावडीपर्यंत नांदेडकडे शतकानुशतकाचा इतिहास पर्यटनाच्या स्वरुपात उपलब्ध आहे. या वारस्याच्या रक्षणासाठी गावागावांमध्ये जनजागृती व्हावी तसेच यासाठी शासनासोबतच राज्य संरक्षित स्मारक संगोपन योजनेलाही जिल्ह्यामध्ये प्रतिसाद मिळावा अशी अपेक्षा आज जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी व्यक्त केली.

महावारसा समितीची बैठक आज जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये झाली. या बैठकीला जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, निवासी उपजिल्हाधिकारी महेश वडदकर, उपवनसंरक्षक केशव वाबळे, पुरातत्व विभागाचे सहाय्यक संचालक अमोल गोटे, रूक्मिण रोडगे, डॉ. कामाजी डक, वास्तुविशारद स्मिता कासार पाटील हे वरिष्ठ अधिकारी तसेच जिल्हा वारसा समितीचे सदस्य उपस्थित होते. यावेळी जिल्ह्यातील प्रमुख स्मारकांच्या संदर्भात सुरू असलेल्या व प्रस्तावित असलेल्या कामांबाबत चर्चा झाली. प्रामुख्याने होट्टल येथील प्राचीन शिल्प मंदिर, माहूर येथील किल्ला, कंधार येथील किल्ला या ठिकाणच्या पर्यटकांच्या सोई-सुविधांवर चर्चा झाली. या बैठकीमध्ये नांदेड जिल्ह्यासाठी समिती गठन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

# आय. सी. टी. लॅब हे विद्यार्थ्यासाठी ज्ञानाचा भांडार

**तभा वृतसेवा**
**देगलुर, दि. २० मार्च**



शहरातील सावित्रीबाई फुले माध्यमिक विद्यालय येथील आय. सी.टी प्रयोगशाळा ही विद्यार्थ्यासाठी वरदान ठरत असून येथील मुख्याध्यापक यशवंत गजभारे यांच्या मार्गदर्शनखाली शाळेमध्ये अनेक उपक्रम राबवण्यात येतात. यापैकी एक उपक्रम सद्या असल्याचे वरदान म्हणून आय.सी.टी लॅब आहे. या प्रयोग शाळेत रामेश्वर वर्जीरे हे विद्यार्थ्याना मार्गदर्शन करतात.

आधुनिक युग हे माहिती तंत्रज्ञानाचे असून सर्वच ठिकाणी संगणकांचाअ वापर होत आहे. माहिती तंत्रज्ञानामुळे जग ठेंगणे झाले आहे. डिजिटल इंडियाच्या स्वप्नपूर्तीसाठी शालेय स्तरावरच्या विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षणाचे धडे मिळणे आवश्यक आहे. आधुनिक काळात टिकायचे असेल तर संगणकाशी मैत्री करावी लागणार हे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद राज्य प्रकल्प संचालक यांनी आय.सी.टी हा उपक्रम राबवण्याचे ठरवले आहे. समग्र शिक्षा अंतर्गत अनेक शाळांना या उपक्रमाचा जास्तीत जास्त फायदा होत आहे. आधुनिक तंत्रांचा वापर करून नेहमीच्या विषय शिकवण्यासाठी व विद्यार्थ्यांची रुची वाढवण्यासाठी येणाऱ्या काळामध्ये विद्यार्थ्यांना या उपक्रमाचा निश्चित फायदा होईल असे शिक्षणाधिकारी जिल्हा परिषद नांदेड यांनी व्यक्त केले आहे. तसेच या उपक्रमासाठी शिक्षणाधिकारी यांनी शुभेच्छा दिल्या आहे. त्याचं बरोबर विद्यालयाचे मुख्याध्यापक यशवंत गजभारे हे सतत प्रयोगशाळेची पाहणी तसेच मार्गदर्शन करतात.

# सिमेंट रोड व नळाला पाणी सोडण्याची सिडको-मोंढा भागातील नागरिकांची मागणी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**

सिडको मोंढा येथे रस्त्याचे काम तात्काळ करावे व या भागाला महानगरपालिकेकडून पाणीपुरवठा करण्यात यावा, अशी मागणी या भागातील नागरिकांनी मनपा आयुक्त आणि आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. येथील राज अपार्टमेंट ई फ्लॅट क्रं २०१ सिडको मोंढा नांदेड येथे अनेक कुटूंबं वास्तव्यास आहेत. निवेदनकर्ता सूर्यभान कागणे हे नांदेड पोलीस दलात पोलीस उपनिरीक्षक या पदावर पोलीस अधीक्षक कार्यालय येथे जनसंपर्क विभागात कार्यरत आहेत. विशेष म्हणजे ते दिव्यांग असून त्यांचे जांगेपासुन दोन्ही पाय गंभीर अपघातात तुटले आहेत.



अशा परिस्थीतीत ते व इतर दिव्यांग बांधव सिडको मोंढा येथुन दिव्यांगाच्या स्कुटीवर कर्तव्याकरीता येणे जाणे करीत असतात. मनपा तर्फे सिडको मोंढा भागातील संपूर्ण रस्ते खोदुन ड्रेनेज पाईप टाकण्यात आली आहेत. परंतु सिमेंट रोड व नळ योजना चालू करण्यात आली नाही. रोड खोदल्यामुळे मोठ मोठे खड्डे पडलेले आहेत. तसेच ड्रेनेजचे चेंबर उघडे पडलेले आहेत. ड्रेनेज फुटल्यामुळे पाणी रस्त्यावर येवुन वाहने स्लीप होत आहेत. त्यामुळे रात्री-अपरात्री जातांना ड्रेनेजच्या खड्ड्यात पडून एखादी प्राणहाणीसारखी मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता आहे. तसेच या भागात पाईप लाईन झालेली आहे. परंतु अद्याप नळाला पाणी सोडण्याची व्यवस्था झालेली नाही. नळाला पाणी देत नाही, रस्ते बरोबर नाहीत. पण नळ पट्टी, घर पट्टीची देयके मात्र मनपाकडून नियमीत दिल्या जात आहे.

सध्या सिडको मोंढा भागातील संपूर्ण सिमेंट रस्ते व नळाला पाणी सोडणे ही कामे लवकर करावीत, अशी मागणी या भागातील रहिवाशांनी आ. आनंदराव बोंढारकर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.या भागात दिव्यांग अधिकारी, कर्मचारी, तसेच इतर दिव्यांग व्यक्ती सुध्दा राहात असतात. पाऊस पडल्यास दिव्यांग व्यक्तींना अतिशय तातडीच्या प्रसंगी दवाखान्यात उपचाराकरीता सुध्दा जात येत नाही. आता कांही दिवसात उन्हाळा सुरु होणार आहे. उन्हाळ्यात जमीनीतील पाणी पातळी कमी होत असते. अशा वेळी बोरला पाणी येत नाही. पाण्याची गंभीर समस्या निर्माण होत आहे. अशा परिस्थितीत आमच्या सारख्या दिव्यांग व्यक्तीची खुप मोठी अडचण निर्माण होत आहे.

सिडको मोंढा भागातील सर्व समस्या सोडविण्यात याव्यात, सिमेंट रस्ते बनविणे आणि नळाला पाणी सोडणे या समस्या लवकर सोडवाव्यात, अशी मागणी नवीन सिडको मोंढा भागातील रहिवाशांच्या वतीने करण्यात आली आहे.

# ग्राम पंचायत भानेगावचा प्रताप

## पुनर्वसनाच्या ५ कोटी रुपयांच्या निधीस लावला सुरुंग

**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि.२० मार्च**

हदगाव तालुक्यातील मोजे. भानेगाव या ग्रामपंचायतास पुनर्वसनाच्या अंतर्गत आलेल्या ५ कोटी रुपयांच्या निधीस संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांनी संगणमत करून या योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या सभागृह, सी.सी. रस्ता, सी.सी.नाली व समाज मंदिर हे पुनर्वसित भागात न करता जुन्या गावात करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी यांच्यावर कठोरात कठोर कारवाई करून सदरील कामास तात्काळ स्थगिती देऊन चौकशी करावी तसेच पुनर्वसन प्लॉट मालकी मिळावे या दोन्ही मागण्या पूर्ण करण्याकरिता ग्रामपंचायत सदस्य प्रशांत सिंगनवाड यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे बेमुदत उपोषणास बसले असून आज त्यांच्या उपोषणाचा चौथा दिवस आहे. तालुक्यात प्रत्येक ग्रामपंचायत अंतर्गत गावात विकास कामांचे नियोजन करण्याकरिता विविध योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होत असतो. शासनाचे हे निधी गावात ग्रामपंचायत कार्यालयास भेटल्यानंतर संबंधित अधिकारी व कंत्राटदार यांचे मनोमिलन झाले तर या आलेली निधीस पद्धतशीरपणे सुरुंग लावण्याचे काम केले जात असते याची मोठ्या प्रमाणावर नागरिकांतून ओरड होतच असते. त्यातील एक प्रकरण म्हणजे मोजे भानेगाव चा असून जिल्हाधिकारी कार्यालयातून पुनर्वसन प्लॉट व निधीची चौकशी करण्याकरिता पत्र निघून सुद्धा संबंधित ग्रामपंचायतचे कर्मचारी यांनी कुठलीही कारवाई न करता एक प्रकारे जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली दाखवत एक प्रकारे आव्हान दिल्यासारखेच दिसत असून संबंधित कंत्राटदार व अधिकारी यांच्यावर कारवाई व्हावी याकरिता प्रशांत सिंगनवाड हे बेमुद्दत उपोषणास बसले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली रुजू

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० मार्च**



जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी या पदाचा मेघना कावली यांनी पदभार स्वीकारला आहे. यापूर्वी या पदावर कार्यरत असलेल्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करनवाल यांची जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून बदली झाली आहे. त्यांच्या जागी शासनाने मेघना कावली यांची नियुक्ती केली आहे. जिल्हा परिषदेच्या कार्यालयात पदभार स्वीकारल्यानंतर मेघना कावली यांनी सर्व विभाग प्रमुखांची ओळख करून घेतली तसेच विविध विभागांच्या कार्यपद्धतीचा आढावा घेतला. रुजू झाल्यानंतर त्यांनी ग्रामीण विकासासाठी नाविन्यपूर्ण योजना हाती घेण्याचा निर्धार व्यक्त केला. तयावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप माळोदे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संतोष तुबाकले, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी शिवप्रकाश चन्ना यांच्यासह सर्व विभागाचे प्रमुख उपस्थित होते.

# नांदेड जिल्ह्यातील अनु. जातीच्या आश्रम शाळांना न्याय द्या!

## शाहु, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचा आंदोलनाचा ईशारा

**तभा वृत्तसेवा**
**मुक्रमाबाद, दि. २० मार्च**

शाहू फुले आंबेडकर १६५ अनुसुचीत जातींच्या आश्रम शाळांना तगछ्ढ शाळासंहिता लागू करुन नियमित वेतनश्रेणी प्रमाणे १०० टक्के अनुदान देऊन शिक्षकांच्या होणा-या आत्महत्या थांबवने बाबत दि. १९ मार्च बुधवार रोजी शाहू, फुले आंबेडकर, अनु. जाती आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी संघटना महाराष्ट्र राज्य, नांदेड जिल्ह्याच्या वतीने सामाजिक न्याय मंत्री यांना जिल्हाधिकारी नांदेड व सहाय्यक आयुक्त समाज कल्याण नांदेड यांच्यामार्फत संघटनेकडून निवेदन देण्यात आले.

शाहु, फुले, आंबेडकर, १६५ आश्रमशाळा योजनेते नांदेड जिल्ह्यात एकूण ११ शाळा आहेत. दरम्यान १६५ आश्रमशाळा योजनेत असलेल्या बीड जिल्ह्यातील केळगाव येथील आश्रमशाळेतील शिक्षक धनंजय नागरगोजे सरांनी १८ वर्षापासून वेतन नसल्याने आत्महत्येचे टोकाचे पाऊल उचलले. नागरगोजे सरांना श्रद्धांजली वाहून मृत शिक्षकांच्या कुटुंबाला रु.१०,००,०००/- (दहा लाख रुपये) ची आर्थिक मदत देण्यात यावी आशी मागणी केली आहे. शासनाकडून या शाळांना न्याय मिळावा अशी भावना येथील शिक्षक व्यक्त करीत आहेत.



गेल्या अनेक वर्षांपासून शाहू, फुले, आंबेडकर १६५ निवासी आश्रमशाळेत अनुसूचित जातीतील गोर गरिबांची मुले शिक्षण घेतात. अनेक वर्षांपासून या शाळांना न्याय मिळत नाही. मात्र या शाळांना १००% प्रमाणे वेतनश्रेणी नुसार अनुदान मिळावे व व्ही जे एन एटी च्या आश्रमशाळेची संहिता लागू करून कर्मचाऱ्यांना सेवा सात्यत मिळावे अशी मागणी कर्मचारी संघटनेची आहे. महाराष्ट्रातील १६५ आश्रमशाळेच्या सखोल तपासण्या झाल्या यातील अनेक शाळा आश्रमशाळा पात्र होवुन देखील. शासनाकडून दखल घेतली जात नाही तसेच शाहू, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा कर्मचारी संघटने तर्फे ५८ दिवस मुंबई आझाद मैदान येथे साखळी आमरण उपोषण होवुन देखील न्याय मिळत नाही हि फार मोठी शोकांतिका आहे. जर अनुदान मिळाले नाही तर अशा किती आत्महत्या होतील? सांगता येत नाही. अनुदान न मिळाल्यामुळे शिक्षकांच्या पदरी निराशाच आली आहे. एका बाजुला अनुदान नाही दुसरीकडे कुटुंबांचा खर्च भागविणे अवघड चालले आहे.

त्यामुळे आश्रमशाळेतील कर्मचारी चिंताग्रस्त,निराशमय जीवन जगत आहे. याच निराशेतून धनंजय नागरगोजे शिक्षकांनी आत्महत्या सारखे टोकाचे पाऊल उचललेले आहे. सरकारने जर आश्रमशाळांना अनुदान दिले असते तर नागरगोजे सरांचा जीव वाचला असता. सरकार अजुन किती आश्रमशाळेतील शिक्षकांचा बळी घ्यायचा आहे? असा संतप्त सवाल शाहु, फुले, आंबेडकर, आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटनेचे राज्य अध्यक्ष अविनाश काळे, राज्य सचिव अतिक अन्सारी, राज्य उपाध्यक्ष विलास पवार, अविनाश साखरे, सहसचिव किरण बोरूडे , कोषाध्यक्ष - सी.डी.पाटील, बापूराव पवार यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर राजुरे, जिल्हा जिल्हा उपाध्यक्ष भास्कर मनुरकर, राठोड डि के, बुद्देवार व्ही जी, शिंदे बी डी, वाघमारे आर के, नळगिरे पि बी, भेंडेकर आर जी, बोरगावे ए बी, मरखेले बी डी, घाटे बालाजी, जाधव ए डी, सावळे आर व्ही, बनसोडे बी बी, जाधव एस पि याची उपस्थिती होती.

# वाळू माफियांनी केलेल्या हल्ल्याचा हिंगोलीत निषेध

## महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघाचे प्रशासनाला निवेदन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

वसमत ते मालेगाव रस्त्यावर अवैध वाळूच्या टिप्परला अडविण्याचा प्रयत्न करणाऱ्या पथकातील तलाठ्यास निळा जि नांदेड येथे वाळू माफीयांनी जबर मारहाण करीत जीवघेणा हल्ला केला. या घटनेचा निषेध करीत जिल्हा प्रशासनाने पथकांना संरक्षण देण्याची मागणी महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघाच्यावतीने निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.



वसमत ते मालेगाव रस्त्यावर वाळू वाहतुक करणाऱ्या टिप्परला महसूलच्या पथकाने अडविण्याचा प्रयत्न केला परंतु सदरील वाहन चालकाने टिप्पर न थांबवता ते पुढे नांदेड जिल्ह्यातील निळा येथे थांबवले. त्याठिकाणी पथकातील तलाठी नागनाथ राऊत यांना चार कारमधून आलेल्या १२ जणांनी शिवीगाळ करीत तुम्ही महसूल वाले खूप माजलेत असे म्हणत लोखंडी रॉड, पट्टा, काठ्यांनी जबर मारहाण करीत जीवे मारण्याचा प्रयत्न केला. तलाठी राऊत यांना गंभीर दुखापत झाल्यानंतर कारमधून आलेले १२ जण निघून गेले. याप्रकरणी वसमत शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर दि २० मार्च रोजी महाराष्ट्र राज्य ग्राम महसूल अधिकारी संघाच्यावतीने तीव्र निषेध करीत जिल्हाधिकारी अभिनव गोयल यांना निवेदन सादर करण्यात आले. त्यामध्ये ग्राम महसूल अधिकारी व मंडळ अधिकारी यांच्यावर सातत्याने हल्ले होत आहेत. पथकाला शस्त्रधारी पोलिस सुरक्षेची मागणी करण्यात येत आहे परंतु आदेश मात्र कागदोपत्रीच होत आहेत. पथकांसाठी वाहनांची व भौतिक सुविधांची उपलब्धता दिली जात नाही. हल्लेखोरांना तत्काळ अटक करून कठोर कार्यवाही करावी, वाळू घाटांवरील सज्जांच्या ग्राम महसूल अधिकाऱ्यांची आळीपाळीने बदली करावी, सातत्याने होत असलेल्या जीवघेण्या हल्ल्याबाबत उपाययोजना कराव्यात आदी मागण्यांचा निवेदनात समावेश आहे.

निवेदनावर राज्य सदस्य सय्यद अयुब सय्यद रसुल, जिल्हाध्यक्ष गजानन रणखांब, सचिव विनोद ठाकरे, के एन पोटे, पी एस पांडे, जी जे नागोरे, व्ही एस पुरी, एस के इंगळे, पी एन हेंबाडे, व्ही एम जाधव, पी एस पाईकराव, एम आर ढगे, एस जी पडोळे, पी जी भेंडे, के आर सांगळे, पी ए खेडकर, एस जी क्षीरसागर, बी डी पांडे, शेख मोहीब, प्रशांत देशमुख, मुकुल शिरपूरकर आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# एकही नागरिक शासकीय योजनेपासून वंचीत राहता कामा नये

## जिल्हाधिकारी गोयल यांच्या सूचना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**



जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी दि १९ मार्च रोजी जवळाबाजार व परिसरातील गावांना भेट दिली. यावेळी त्यांनी उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांना एकही नागरिक शासकीय योजनेपासून वंचीत राहता कामा नये अशा स्पष्ट सूचना दिल्या.

यावेळी उपविभागीय अधिकारी विकास माने, सहाय्यक गटविकास अधिकारी बालाजी गोरे, तहसीलदार हरीश गाडे, डॉ ज्ञानेश्वर चौधरी यांच्यासह यंत्रणांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी गोयल यांनी जवळाबाजार येथील गावकऱ्यांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी काही भागात पाहणी देखील केली. यामध्ये नागरिकांनी पिण्याचे पाण्यासोबतच इतर प्रश्न जिल्हाधिकारी यांचेसमोर मांडले. यामध्ये प्रामुख्याने जात प्रमाणपत्र, घरकुल योजनेंतर्गत घरकुलाचा लाभ मिळणे, वाहतुकीसाठी रस्ता बांधकाम करणे, पथदिवे उभारणे या समस्यांचा समावेश होता. प्रशासनाने या समस्या सोडवण्याची अपेक्षा गावकऱ्यांनी यावेळी व्यक्त केली.

त्यानंतर जिल्हाधिकारी गोयल यांनी महसूल व पंचायत समितीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा केली. याठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी नवीन हातपंप घेण्याबाबत सूचना त्यांनी केल्या. तसेच जात प्रमाणपत्रासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे देण्यासाठी विशेष शिबीर परिसरात घ्यावे अशा सूचनाही गोयल यांनी दिल्या. परिसरातील गावकऱ्यांच्या आरोग्य तपासणीसाठी आरोग्य विभागाने वेळोवेळी शिबीरे घ्यावीत. या भागातील एकही नागरिक शासकीय योजनेपासून वंचीत राहता कामा नये याची दक्षता घ्यावी अशा कडक सूचना गोयल यांनी दिल्या. त्यानंतर असोला येथील ग्रामस्थांशी संवाद साधला, शाळेला भेट देऊन गुणवत्ता पाहीली.

# माळरान खडकाळ २ एकर जमिनीत शेतकऱ्याने फुलवली केशर आंब्याची बाग

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

औंढा नागनाथ शहरातील अल्पभूधारक शेतकरी अनिल देशमुख यांनी समाजकारण करत असतानाच त्यांना शेतीची आवड होती.माळरानावर खडकाळ जमीन घेतली. औंढा नागनाथ तालुक्यातील ब्राह्मणवाडा शिवारात अनिल देशमुख या शेतकऱ्याने खडकाळ माळरान जमिनीत गाळ भरून दोन एकरावर केशर आंब्याची बाग फुलविली. यंदा हवामान फारसे पोषक नसतानाही योग्य नियोजनाच्या बळावर शेतकरी अनिल देशमुख यांनी गेल्या वर्षी आंबा बागेच्या माध्यमातून २ लाखांचे उत्पादन घेतले आहे.

औंढा नागनाथ तालुक्यातील पंचायत समितीचे माजी उपसभापती अनिल देशमुख यांनी आठ वर्षांपूर्वी ब्राह्मणवाडा शिवारात माळरान जमीन खरेदी केली. त्या जमिनीत तलावातील गाळ भरून सुपिकता वाढविली. अन्य पिके न घेता अनिल देशमुख यांनी दोन एकरात सातशे केशर आंब्याच्या रोपांची लागवड केली. पाण्याचे योग्य नियोजन करून रोपे वाढविली. चार वर्षांनंतर आंबा झाडाला फळ धारणा झाली. यंदा आंब्यांसाठी फारसे पोषक वातावरण नव्हते. यावर मात करीत शेतकरी अनिल देशमुख यांनी चांगले संवर्धन केले. प्रति किलोचा



१०० रुपये दर मिळाला असता, दोन एकरात सुमारे ४ लाख रुपयांचे उत्पादन हाती पडले. शेती कमीच आहे. सर्व माळरान आहे. पाण्याची सोय नाही, अशी ओरड करून इतर पिके घेणाऱ्या शेतकऱ्यांपुढे त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

केशर आंबा बागेच्या अंतर्गत मशागतीचे कामे वेळेत व्हावे,यासाठी मजूर व मी स्वतः आधी शेतीची कामे करून घेतो .नंतर मी समाजकारण करतो. कष्टाच्या बळावर दोन एकरात गेल्या वर्षी २ लाख रुपयांचे उत्पादन मिळाले. ९० ते १०० रुपये प्रति किलो दर बांधावर मिळाला अशी माहीती अनिल देशमुख यांनी दिली.

दोन एकर आंबा बाग जोपासण्यासाठी एक विहिरी आहे. या पाण्याचे योग्य नियोजन करून फळबाग जोपासली. २१ दिवसाआड फवारणी केली जाते. गेल्या वर्षी दोन लाखाचे उत्पन्न झाले यावर्षी चार लाखाचे उत्पन्न होईल अशी आशा आहे.असे शेतकरी अनिल देशमुख यांनी सांगितले.

औंढा नागनाथ तालुक्यातील ब्राह्मणवाडा ग्रामीण भागातील माळरान खडकाळ जमिनीवर गट क्रमांक ८४ मध्ये पंचायत समिती औंढा नागनाथ अंतर्गत व्यक्तिगत फळ लागवड २०२०-२१ मध्ये फळबाग योजनामध्ये केशर आंब्याची लागवड केली. त्यावेळी या योजनेसाठी शासनाचे सहा लाख रुपयांची मदत होती.या योजनेच्या जोरावरच शेतकरी अनिल देशमुख यांनी माळरानावरील खडकाळ जमिनीवर केशर आंब्याची कष्ट करून बाग फुलवली.

## संक्षिप्त वृत्त

### जडगाव येथे डॉ शेळके यांची भेट



हिंगोली- आरोग्यवर्धिनी केंद्र जडगाव येथे संजीवनी अभियान मोहीम अनुषंगाने जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके यांनी संजीवनी अभियानाअंतर्गत कर्करोगाबाबत केलेल्या सर्वेक्षणाविषयी प्रत्यक्ष गावामध्ये भेट देऊन पाहणी केली. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ. गजानन चव्हाण, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. दामोदर बिरगड, आरोग्य सेवक नंदकिशोर कोकाटे, गटप्रवर्तक श्रीमती डावरे, आशा वर्कर प्रतिभा घोडके व लक्ष्मी बगाटे उपस्थित होते.

### उपसरपंचपदी पुष्पा स्वामी यांची निवड



औंढा नागनाथ- तालुक्यातील शिरड शहापूर येथील ग्राम पंचायतच्या उपसरपंचपदी पुष्पा शिवहार स्वामी यांची आज दिनांक २० मार्च रोजी बिनविरोध निवड करण्यात आली. येथील उपसरपंच संभाजी जोगदंड यांनी मागील एक महिन्यापूर्वी त्यांच्या उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे उपसरपंचाची जागा रिक्त झाली होती. त्यानुसार दिनांक २० मार्च रोजी ग्रामपंचायत कार्यालय शिरड शहापूर येथे येथील सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली उपसरपंच पदासाठी निवड ठेवण्यात आली होती. त्यामध्ये पुष्पा शिवहार स्वामी यांचा उपसरपंच पदासाठी एकमेव अर्ज आल्यामुळे पुष्पा शिवहार स्वामी यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड करण्यात आली. या निवड प्रक्रियेसाठी अध्यासी अधिकारी म्हणून सरपंच यशवंत रावले यांनी काम पाहिले तर सचिव म्हणून ग्रामविकास अधिकारी गंगाधर हलबुर्गे यांनी सहकार्य केले. निवडीनंतर उपसरपंचाचे सर्वांच्या वतीने सत्कार करण्यात आले. यावेळी सरपंच यशवंत रावले, ग्रामपंचायत सदस्य अरुणा बिच्चेवार, नाजेमा सय्यद, संभाजी जोगदंड, जयराम सूर्यतळ, शिवराज कोंडे, मीना रावले, शीला बिचेवार, आशा कटारे, दीक्षा सूर्यतळ, मुक्ता लांडगे, अनिता तांबिले, शेख इब्राहीम, रोहिणी मुक्कीरवार, शेख गुलाम नबी आदींची उपस्थिती होती.

# जिल्हाधिकारी कार्यालयात जागतिक ग्राहक दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात दि २० मार्च रोजी जागतिक ग्राहक दिन साजरा करण्यात आला.

यावेळी जिल्हाधिकारी अभिनव गोयल, ग्राहक पंचायत महाराष्ट्र चे अध्यक्ष अॅड राजेंद्र अग्रवाल, जिल्हा पुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, सीए महेश बियाणी, एम एम राऊत ज्येष्ठ पत्रकार डॉ विजय निलावार, सुभाष लदनिया, भिकुलाल बाहेती यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मान्यवरांच्याहस्ते स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्राहक पंचायतचे अध्यक्ष अॅड राजेंद्र अग्रवाल यांनी ग्राहक दिनाचे महत्व तसेच जागतिक ग्राहक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच प्रास्ताविक भाषणात ग्राहकांच्या हक्काबाबत तसेच कर्तव्याबाबत माहीती दिली.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गोयल म्हणाले की, ग्राहक हा केंद्रबिंदू असतो. त्यामुळे ग्राहकांच्या हक्काबाबत त्यांना माहीती होणे गरजेचे आहे. ग्राहकांना त्यांच्या झालेल्या नुकसानीबाबत कायद्यामध्ये तरतुद आहे. त्यांची नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी पंचायतने ग्राहकांना मदत करण्याची आवश्यकता आहे.

# हिंगोली पोलिस अधीक्षकांनी मोडीत काढली 'भाऊ' ची दादागिरी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

सेनगाव तालुक्यात वाळू उपसा करून वाहतुक करीत दादागिरी करणाऱ्या भाऊ ची पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी अवघ्या दोन तासात दादागिरी मोडीत काढीत त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

सेनगाव तालुक्यातील एका वाळू माफीयाने टेबलवर नोटांचे बंडल्स टाकून रिल्स बनवली होती. याची दखल पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी घेत या भाऊ ची दादागिदी अवघ्या दोन तासात उतरवीत त्याच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे आदेश सेनगाव पोलिसांना दिले. तसेच त्यांचा व्हीडीओ बनवून प्रसार माध्यमांवर भाऊ आणि त्याचा साथीदार यांना हात जोडून पुन्हा अशा प्रकारचे कृत्य करणार नाही. गुन्हे करणार नाही असे बोलतांना टाकला आहे. पोलीस स्टेशन अंतर्गत भाऊ उर्फ धनसिंग शेषराव राठोड याने आपल्या मोबाईलवर पैशाचे गट्टे घेऊन व वाळू व्यवसाय संबंधी रिल्स ठेवून दहशत पसरलेल्या संदर्भाने व्हिडिओ व्हायरल झाला होता. त्या अनुषंगाने हिंगोली पोलिसांनी भाऊ उर्फ धनसिंग राठोड, व त्याचा साथीदार शिवाजी संतोष राठोड यांना ताब्यात घेऊन त्यांचा गुन्हेगारी इतिहास काढून कठोर प्रतिबंधक कार्यवाही करून योग्य समज दिली व खाकीचा प्रसाद दिला. भाऊने तात्काळ झालेली चूक मान्य करून यापुढे गुन्हेगारी क्षेत्र सोडून शेती व्यवसाय करण्याचे कबूल केले. दोघांवरही पोलिसातर्फे कठोर प्रतिबंधक कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच यानंतर सुद्धा दहशत पसरविण्यासाठी रिल्स ठेवणारे गुन्हेगारांचा शोध घेऊन हिंगोली पोलीस तर्फे कठोर कार्यवाही करण्यात येणार असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले.

# जि. प. चा ९ कोटी ८२ लाखांचा अर्थसंकल्प सादर

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

जिल्हा परिषदेचा सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी वित्त व लेखा अधिकारी यांनी दि १९ मार्च रोजी ९ कोटी ८२ लाख ३ हजाराचा सादर करण्यात आला.



यामध्ये ठळक बाबीमध्ये जिल्हा परिषदेचे उत्पन्न वाढविण्यासाठी ठेवींची गुंतवणूक करण्यात आली आहे. उत्कृष्ट काम करणाऱ्या अधिकारी, कर्मचारी, अभियंता, ग्रामपंचायत अधिकारी यांना पुरस्कार प्रदान करण्यासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. तसेच शिक्षण विभागांर्तगत डिजीटल शाळांसाठी सौरउर्जा बसविण्यासाठी निधी, जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षकांचा सत्कार, इयत्ता ४ ते ७ वीच्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता परीक्षा घेणे, मुलींच्या संरक्षणासाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसविणे, आरोग्य विभागांतर्गत कॅन्सन व ऱ्हदयरोग रूग्णांना आर्थिक सहाय्य तसेच पिसाळलेला कुत्रा चावल्यानंतर, सर्पदंश यासाठी तरतुद करण्यात आली आहे. कृषी विभागांतर्गत शेतकऱ्यांना आखाड्यावर सोलार बसविणे, पीक संरक्षण व उपकरणे खरेदीसाठी अर्थसहाय्य, विधवा महिलांना शेळ्या पुरविणे, जनावरांच्या लसीकरणासाठी आर्थिक तरतुद या अर्थसंकल्पात करण्यात ाआली आहे.

मागावर्गीयांसाठी वीस टक्के, ग्रामीण पाणी पुरवठासाठी वीस टक्के निधी, महिला व बालविकाससाठी ८ टक्के, दिव्यांग कल्याणासाठी ५ टक्के निधीची तरतुद केली आहे. वनीकरणासाठी

शाळा दुरूस्तीसाठी ५ टक्के, जिल्हापरिषदेअंतर्ग अभिलेख्याची संगणकीकरण, विकासासाठी यशोगाथा लघुपट तयार करणे, ई-गव्हर्नस यासाठी निधीची तरतुद करण्यात आली आहे. यावेळी वित्त व लेखा अधिकारी माडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडै अर्थसंकल्प सादर केला. यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अनंतकुमार कुंभार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

# भरतीची तयारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० मार्च**

पोलिस विभागाच्या भरतीची प्रक्रिया होणार असल्यामुळे येथील जिल्हा परिषद, संत नामदेव कवायत मैदान, रामलीला मैदान तसेच तालुका क्रिडा संकुल आदी भागांमध्ये पहाटे पासून युवक-युवती भरती प्रक्रियेची तयारी करण्यासाठी गोळा फेक, लांब उडी, उंच उडी तसेच धावण्याचा सराव करतांना दिसत आहेत. आगामी पोलिस भरतीच्या तारखेची हे युवक-युवती वाट पाहत आहेत. काही संस्थांच्याद्वारे युवक-युवतींना भरतीचे प्रशिक्षणही देण्यात येत असल्याचे दिसत आहे.